















# वार्तापत्र

## सप्टेंबर २०२१

**समर्थन प्रकाशन**

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२० ☎०२२-२२००३०६०
✉: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

## समर्थन


संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **डॉ. आशिष भोसले**



संपादन : **मुक्ता भारती व हिंदप्रभा कर्वे**

विश्लेषण
**रुपेश कीर** -९८९२९३९६१७

सहाय्य
**स्नेहा घरत** -८४८५८९४४६३

प्रसिद्धी
**मनोज सातवी** -९२७३७९६९९९

मांडणी
**प्रतिक्षा कोयंडे**



**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई

सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी



प्रकाशक (पत्रव्यवहार):
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला,
बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०
☏०२२-२२००३०६०

Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org


# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे ‘समर्थन’

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे ‘समर्थन’. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### ‘समर्थन’च्या कामाचे विविध स्तर

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.

◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.

◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.

◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.

◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.

◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.

◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.

◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

संपादकीय

# कुपोषण निर्मूलनात अंगणवाडी केंद्र व अंगणवाडी सेविकेचे महत्त्व अनन्यसाधारण!

'एकात्मिक बाल विकास सेवा योजना' २ ऑक्टोबर १९७५ साली देश पातळीवर सुरू करण्यात आली. ही योजना प्रत्यक्षात आणीबाणीच्या काळात सुरू झाली असली, तरी तिचा मुख्य उद्देश गरिबातल्या गरीब बालकांचे आरोग्य सुधारणे हा होता. त्यावेळेस युनिसेफ, जागतिक बँक या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या मदतीने सुरू झालेला; केंद्र शासनासाठी हा महत्त्वाचा प्रकल्प होता. प्रायोगिक तत्वावर (Pilot Project) सुरू झालेला हा प्रकल्प सुरुवातीला देशभरात ३३ ठिकाणी सुरू करण्यात आला. या प्रकल्पाचे गाव-वस्ती पातळीवरील केंद्र होते. ते म्हणजे अंगणवाडी केंद्र. त्यामुळे पुढे अंगणवाड्या या योजनेच्या अंमलबजावणीचे महत्त्वाचे केंद्र बनल्या. पुढे आरोग्यासोबतच ३ ते ६ वयोगटातील मुलांना पूर्व प्राथमिक शिक्षण देणे हे देखील उद्दिष्ट्य अंगणवाड्यांना साध्य करायचे होते. कारण या अंगणवाड्यांची धुरा ज्या अंगणवाडी सेविकांवर आहे, त्या ताईच पुढे या मुलांना प्राथमिक शाळेत दाखल करण्यासाठी मदत करणार होत्या. **अंगणवाडीच्या जडणघडणीत महाराष्ट्राच्या शिक्षण तज्ज्ञ ताराबाई मोडक आणि त्यांच्या शिष्या अनुताई वाघ यांचे मोठ योगदान राहिले आहे. या दोघींवरही प्रसिद्ध इटालियन शिक्षण तज्ज्ञ मॉंटेसरी मारिया यांचा प्रभाव होता. म्हणून केवळ ६ महिने ते ६ वर्षांच्या बालकांच्या आरोग्यासाठी काम करून चालणार नाही, तर बाळाला जन्म देणाऱ्या आईची देखील काळजी घेतली पाहिजे हे त्यांनी सरकारच्या लक्षात आणून दिले.** आज मागास, ग्रामीण, शहरी व आदिवासी क्षेत्रात राहणाऱ्या बालक आणि मातांसाठी अंगणवाडीद्वारे पूरक पोषण आहाराच्या सेवा पुरविल्या जातात. त्यामुळे बालमृत्यू रोखण्यासाठी आणि कुपोषणाचा दर कमी करण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरली आहे.

देशाची सशक्त पिढी घडवण्यात अंगणवाडी ही संस्था आणि अंगणवाडी सेविका यांचे महत्त्व अनन्यसाधारण राहिले आहे. 'एकात्मिक बाल विकास सेवा योजने'च्या माध्यमातून गेली ४५ वर्षे 'पूरक पोषण आहार' योजना राबविली जात आहे; त्याचे माध्यम हे अंगणवाडी केंद्र असून या योजनेमुळे बालकांचे आरोग्य व शिक्षण सुधारण्यात कमालीची मदत झालेली आहे. त्यामुळे या योजनेसाठी शासनाने गुंतवणूक वाढविली पाहिजे. लहान मुलांचा शारीरिक व मानसिक विकासाचा पाया मजबूत करायचा

असेल तर अंगणवाडी केंद्र व त्यातून दिल्या जाणाऱ्या सोयी-सुविधांना पर्याय नाही. शासन मग ते केंद्रातील असो, वा राज्या-राज्यातील किंवा स्थानिक प्रशासन शासनाने नेहमीच बालकांच्या आरोग्यावर, शिक्षणावर केलेला खर्च म्हणजे राष्ट्र उभारणीसाठी केलेली गुंतवणूक असचे मानले पाहिजे.

**आपण भारतातील अंगणवाड्यांच्या विस्ताराचा अभ्यास केला तर, सन २००६ पर्यंत देशाच्या केवळ १/३ भागात अंगणवाड्यांचे काम सुरू हेते. परंतु कुपोषणाने उग्र रूप धारण केल्यानंतर मान. सर्वोच्च न्यायालयाने अंगणवाड्यांचे महत्त्व अधोरेखित करीत अंगणवाड्यांचे सार्वत्रिकीकरण केले जावे असे आदेश दिले.** आज भारतात १५ लाखांहून अधिक अंगणवाड्या कार्यरत आहेत. त्यामधून २० कोटी मुलांना या योजनेचा लाभ मिळत आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर ग्रामीण आदिवासी आणि शहरी वस्त्यांमध्ये साधारण १ लाख ३ हजारांपेक्षा जास्त अंगणवाड्या कार्यरत असून १ कोटी ५० लाख बालक लाभार्थी आहेत. या अंगणवाड्यांचा मुख्य आधारस्तंभ असलेल्या अंगणवाडी सेविकांची संख्या १ लाख १० हजार असून तेवढ्याच मदतनीस कार्यरत आहेत.

'एकात्मिक बाल विकास सेवा योजने' अंतर्गत राबविला जाणारा अंगणवाडी हा उपक्रम जरी केंद्र सरकारचा असला तरी त्याची अंमलबजावणी राज्य सरकारच्या 'महिला आणि बाल विकास विभागा'कडून करण्यात येते. असे असले तरी राज्य शासनाचे या विभागाकडे सातत्याने दुर्लक्ष झाले आहे. **सन २०१२-१३ मध्ये या विभागावर एकूण अर्थसंकल्पाच्या १.६१टक्के खर्च झाला होता. त्यात सातत्याने घट होत खर्चाचे हे प्रमाण सन २०२१-२२ मध्ये केवळ ०.७९ टक्क्यांवर आले आहे. ही अत्यंत चिंतेची बाब आहे. मागील १० वर्षात राज्याचा सरासरी खर्च प्रती वर्षी २ लाख ४४ हजार कोटी रुपये इतका झालेला असताना, 'महिला व बाल विकास विभागा'वरील खर्च मात्र प्रती वर्षी सरासरी ३ हजार कोटी रुपयेही नाही हे वास्तव आहे.** आजही अनेक अंगणवाड्यांमध्ये आहार मिळण्यासाठी दोन-दोन महिने वाट पहावी लागते. अनेक ठिकाणी अंगणवाडी सेविकांना स्वत: पदरमोड करून पैसे उसने घेऊन आहार पुरवावा लागतो. त्यामुळे महाराष्ट्रातील अंगणवाडी सेविकांची आर्थिक स्थिती बिकट बनली आहे. खुद्द राज्य शासनाच्या नियोजन विभागाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयाने केलेल्या पाहणीत २० हजारांपेक्षा जास्त अंगणवाड्या या भाड्याच्या जागेत भरतात. ५ हजार ७०० पेक्षा जास्त अंगणवाड्या या ऊन-वारा-पावसात मोकळ्या जागेत भरतात. ५ हजार अंगणवाड्यांचे बांधकाम हे कच्च्या स्वरुपाचे आहे. पावसाळ्यात या अंगणवाड्या गळतात; अनेक अंगणवाड्यांमध्ये पाणी साचते. अशा जागेत मुलांना बसवणे मोठ्या जोखमीचे असते. २

हजार ७२३ अंगणवाड्या अशा आहेत, जिथे पिण्याच्या पाण्याची कोणतीही सुविधा उपलब्ध नाही. ४७ हजारांपेक्षा जास्त अंगणवाड्यांमध्ये वापरण्यायोग्य शौचालय उपलब्ध नाही. याचा अर्थ मुलांना एकतर उघड्यावर जावे लागते किंवा कोणाच्या तरी घराचा आसरा घ्यावा लागतो. २९ हजारांपेक्षा जास्त अंगणवाड्या अशा आहेत जिथे मुलांना बसण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही. प्रत्येक अंगणवाडी केंद्रात मुलांना खेळण्यासाठी बाहेर मोकळा परिसर असला पाहिजे. आजही ३५ हजारांपेक्षा जास्त अंगणवाड्यांमध्ये खेळासाठी मोकळे आंगण नाही. ६ हजार १२६ अंगणवाड्यांमध्ये पूरक पोषण आहाराची नियमित उपलब्धता होत नाही. २७ हजार ४५१ अंगणवाड्यांमध्ये वजन काटा सुस्थितीत नाही. ८१ हजार ८३३ अंगणवाड्यांमध्ये मानकानुसार औषधे पुरवली गेली नव्हती. ३४ हजार ९० अंगणवाड्यांमध्ये वैद्यकीय पथकाने गेल्या ३ महिन्यात भेटी दिल्या नव्हत्या. ४८% अंगणवाड्यांमध्ये मुलांना खेळासाठी साहित्य पुरविलेले नाही. तर २८% अंगणवाड्यांमध्ये शैक्षणिक संच दिले गेलेले नाहीत. इतका मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव अंगणवाडी केंद्रात आहे.

० ते ६ वर्षे वयोगटातील मुलांना पूरक पोषण आहार त्यातील ३ ते ६ वयोगटातील मुलांना शाळा पूर्व शिक्षण, गरोदर आणि स्तनदा मातेला पूरक पोषण आहार, मुल व माता यांचे नियमित लसीकरण, किशोरवयीन मुलींच्या आरोग्याची तपासणी. थोडक्यात काय तर वंचित वर्गातील नवी पिढी निरोगी आणि सुदृढ बनविण्यात अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांची महत्त्वाची भूमिका आहे. मात्र या अंगणवाडी ताईची महाराष्ट्रात उपेक्षा केली जाते; तिला आज महिना रु.६,५००/- रुपये मानधन मिळते. तर गोव्या सारख्या राज्यात रु.१५,०००/-, केरळ मध्ये रु.१०,०००/-, तामिळनाडू रु.१३,३४०/-, तेलंगणात रु.१०,५००/- तर पाँडेचेरीत रु.१९,४८०/- रुपये इतके मानधन अंगणवाडी सेविकांना दिले जाते. यावरून आर्थिक क्षेत्रात आघाडीवर असणाऱ्या महाराष्ट्रात अंगणवाडी सेविका किती दुर्लक्षित आहे याचा आपल्याला अंदाज येतो. तुटपुंज्या मानधनावर काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकांना इतर कोणत्याही सोयी-सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांच्यामध्ये असंतोषाचे वातावरण आहे. अशा अंगणवाडी सेविकांवर आंदोलन केल्यामुळे मार्च २०१८ मध्ये अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियमांतर्गत (MESMA) कारवाई करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. मात्र शासनाला आपली चूक कळली आणि तो निर्णय पुढे रद्द करावा लागला. एका ठिकाणी पुरेसे मानधन द्यायचे नाही. सोयी-सुविधा उपलब्ध करून द्यायच्या नाहीत, मात्र दुसऱ्या ठिकाणी आंदोलने केली, मोर्चा काढले म्हणून कायद्याचा धाक दाखवायचा हे योग्य नाही. 'पूरक पोषण आहार योजने' द्वारे आपण कुपोषणावर नक्कीच मात करू शकणार आहोत, मात्र या योजनेच्या अंमलबजावणीची दोरी ज्या अंगणवाडी सेविकेच्या हातात

आहे, त्या ताईला यथायोग्य मानधन मिळू शकले; तर महाराष्ट्रातही ही योजना यशस्वी होऊ शकेल यात वाद नाही.

सदर वार्तापत्रासाठी 'एकात्मिक बाल विकास सेवा योजना' त्या अनुषंगाने 'पूरक पोषण आहार' व अंगणवाडी उपक्रमांच्या महाराष्ट्रातील अंमलबजावणीची सद्यस्थिती अभ्यासण्यासाठी 'समर्थन'कडून महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाच्या 'अर्थ व सांख्यिकी संचालनालयाने' केलेल्या अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवालाची मदत घेण्यात आली आहे. त्या आधारे राज्यातील ग्रामीण, आदिवासी व नागरी क्षेत्रातील अंगणवाड्यांची काय स्थिती आहे. याचा अंदाजित ठोकताळा बांधून त्याची माहिती या वार्तापत्रात देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे 'महिला व बाल विकास विभागाचे कार्यक्रम अंदाजपत्रक, खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज-भाग २, शासन निर्णय व परिपत्रक, तसेच समर्थन प्रतिनिधींनी पालघर मधील जव्हार, ठाण्यातील मुरबाड तर नाशिक जिल्ह्यातील नाशिक व इगतपुरी तालुक्यातील अंगणवाड्यांची केलेल्या प्रत्यक्ष पाहणीतून समोर आलेल्या माहितीचा उपयोग या वार्तापत्रात करण्यात आला आहे. मागील वार्तापत्राप्रमाणे याही वार्तापत्राला चांगला प्रतिसाद द्याल ही अपेक्षा आहे.

सदर वार्तापत्रातील माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू. प्रकाशन अधिक माहितीपूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे. 'समर्थन' प्रकाशित करीत असलेल्या माहितीबाबत अधिक जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थ तज्ज्ञ, विषय तज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी 'समर्थन' स्वीकारीत आहे.

धन्यवाद.

**संपर्क व प्रतिक्रिया:** ————————————————————

————————————————————————————

————————————————————————————

————————————————————————————

————————————————————————————


# महिला व बाल विकास विभागाचे राज्य अर्थसंकल्पातील स्थान नगण्य!

महिला व बाल विकास विभागामार्फत समाजातील महिला व बालक या घटकांच्या विकासाचे प्रश्न हाताळण्यासाठी विविध योजना कार्यरत आहेत. या सर्व योजनांवर किती खर्च केला जातो. राज्याच्या एकूण अर्थसंकल्पात या महत्त्वाच्या घटकांसाठी असलेला वाटा मागील १० वर्षात किती राहिला आहे; तसेच महिला व बाल विकास विभागाची 'एकात्मिक बाल विकास सेवा योजना' या प्रमुख योजनेचा अंमलबजावणी कशा पद्धतीने होत आहे, या योजनेच्या अंमलबजावणीत अंगणवाडी हा मध्य बिंदू असून त्यातील अंगणवाडी सेविका हा लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणारा महत्त्वाचा दुवा आहे. योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना या घटकाला कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते या सर्व बाबींचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या अहवालात करण्यात आला आहे.

राज्याच्या अर्थसंकल्पात महिला व बाल विकास विभागाचे गेल्या दहा वर्षातील स्थान नगण्य राहिले असून ते सरासरी १.२३ टक्क्यांवर गेलेले नाही. वर्ष २०१२-१३ मध्ये एकूण अर्थसंकल्पाच्या तुलनेत १.६७ टक्के एवढा खर्च करण्यात आला होता. त्यात सतत्याने घट झाली असून हा खर्च वर्ष २०१९-२० मध्ये १.१२ टक्क्यांवर आलेला आहे. तर चालू वर्षात २०२१-२२ मध्ये हा खर्च एकूण अर्थसंकल्पाच्या तुलनेत ०.७९ टक्के एवढा कमी अंदाजित करण्यात आला आहे. एकूण अर्थसंकल्पात महिला व बाल विकास विभागाचा निधीत सातत्याने घट होताना दिसत आहे. त्यामुळे महिला, बालके यांच्या आरोग्यावर त्याचा अनिष्ट परिणाम होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. त्यादृष्टीने 'एकात्मिक बाल विकास सेवा योजना' या महत्त्वाच्या योजनेचा वस्तुनिष्ठ तौलानिक अभ्यास करणे गरजेचे होते. त्यासाठी हा प्रयत्न केला गेला आहे. या योजनेअंतर्गत ज्या सेवा पुरविल्या जातात. त्याचा थेट परिणाम ग्रामीण, आदिवासी व नागरी क्षेत्रातील महिला व बालकांच्या विकासावर होत असतो. अगदी महिन्याभरासाठी देखील योजनेची अंमलबजावणी शिथिलता आली किंवा त्यात अडचणी निर्माण झाल्यात तर मेळघाट, पालघर, नंदुरबार अशा आदिवासी दुर्गम भागातच नाही तर इतर ग्रामीण भागातही कुपोषणात वाढ होते, हे सातत्याने दिसून आले आहे. मात्र या योजनेची प्रभावी अंमलबजावणी झाली तर या भागातील कुपोषण कमी राहते, हे ही दिसून आले आहे. त्यासाठी 'एकात्मिक बाल विकास प्रकल्प योजनेची' प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. या योजनेअंतर्गत पूरक पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणीची प्रमुख जबाबदारी अंगणवाडी केंद्रावर त्या अनुषंगाने अंगणवाडी सेविकांवर आहे. त्यामुळे अंगणवाडी केंद्र व अंगणवाडी सेविकांच्या काय समस्या आहेत हे जाणून घेण्याचा प्रयत्न या अहवालात केला आहे.

## १.१ महिला व बाल कल्याण विभागाचे राज्य अर्थसंकल्पातील स्थान:

**आलेख क्र. १:**




(**स्त्रोत:** *वित्त विषयक निवेदन तसेच महिला व बाल विकास विभागाचा अर्थसंकल्प व प्रत्यक्ष खर्च, वर्ष: २०११-१२ ते २०१९-२०, सुधारित अंदाज २०२०-२१ तसेच अर्थसंकल्पीय अंदाज २०२१-२२)*

☞ महिला व बाल कल्याण विभागाचे राज्य अर्थसंकल्पातील स्थान सातत्याने घटते राहिले आहे.

☞ वर्ष २०११-१२ ते २०१९-२० या ९ वर्षात राज्य अर्थसंकल्पात महिला व बाल कल्याण विभागाचा सरासरी खर्च १.२७% एवढा.

☞ वर्षे २०१२-१३ मध्ये राज्य अर्थसंकल्पातील महिला व बाल कल्याण विभागाचा वाटा १.६१% होता त्यात पुढील काळात सातत्याने घट होत राहिली असून वर्ष २०१६-१७ मध्ये तो केवळ ०.९६% आला.

☞ वर्ष २०२१-२२ या चालू वर्षात महिला व बाल कल्याण विभागाचा अंदाजित खर्च राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत आतापर्यंतचा सर्वात कमी म्हणजे ०.७९% इतका आहे.

## १.२ महिला व बाल विकास विभागाचा मागील १० वर्षांत झालेला खर्चाचे राज्याच्या खर्चाशी प्रमाण :

**तक्ता क्र. १ :** (रु. कोटीत)

| वर्ष | राज्य | महिला व बाल वि.वि. | खर्चाचे प्रमाण |
|---|---|---|---|
| २०११-१२ | १,४९,२२८ | २,३३९ | १.५७ |
| २०१२-१३ | १,६५,४६८ | २,६७० | १.६१ |
| २०१३-१४ | १,८७,९८२ | २,५६६ | १.३७ |
| २०१४-१५ | २,१७,७४७ | २,८७९ | १.३२ |
| २०१५-१६ | २,२५,२८६ | ३,०६४ | १.३६ |
| २०१६-१७ | २,५६,९४२ | २,४५७ | ०.९६ |
| २०१७-१८ | २,८६,७६८ | २,७८८ | ०.९७ |
| २०१८-१९ | ३,२८,७३२ | ३,९२३ | १.१९ |
| २०१९-२० | ३,७८,६६६ | ४,२३३ | १.१२ |
| सरासरी खर्च | २,४४,०९१ | २,९९१ | १.२३ |
| २०२०-२१ (सु. अ.) | ४,३७,३९१ | ५,४४५ | १.२४ |
| २०२१-२२ (अ. अं.) | ४,८४,०९१ | ३,८२० | ०.७९ |

(**स्त्रोत**: *वित्त विषयक निवेदन तसेच महिला व बाल विकास विभागाचा अर्थसंकल्प व प्रत्यक्ष खर्च, वर्ष: २०११-१२ ते २०१९-२०*)

**टीप**: *वर्ष २०२०-२१ मध्ये प्रत्यक्ष खर्च आला नसल्याने सुधारित अंदाज दिलेले आहेत तर वर्ष २०२१-२२चे अर्थसंकल्पीय अंदाज आहेत.*

☞ वर्ष २०११-१२ ते २०१९-२० या ९ वर्षाच्या कालावधीत राज्य शासनाने दरवर्षी सरासरी २ लाख ४४ हजार ९१ कोटी रुपये खर्च केले, त्या तुलनेत महिला व बाल विकास विभागावर २ हजार ९९१ कोटी खर्च करण्यात आले. महिला व बाल विकास विभागाचा खर्च १.२३% इतका राहिला आहे.

☞ वर्ष २०१२-१३ मध्ये राज्य अर्थसंकल्पावर १ लाख ६५ हजार ४६८ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. त्या तुलनेत महिला व बाल विकास विभागावर २ हजार ६७०कोटी खर्च करण्यात आले होते. खर्चाचे हे प्रमाण आता पर्यंत सर्वात मोठे असून ते १.६१% इतके होते.

☞ वर्ष २०१६-१७ मध्ये राज्य अर्थसंकल्पावर २ लाख ५६ हजार ९४२ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. त्या तुलनेत महिला व बाल विकास विभागावर २ हजार ४५७ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. खर्चाचे हे प्रमाण सर्वात कमी असून ते ०.९६% इतके होते.

☞ वर्ष २०२१-२२ या वर्षात राज्य अर्थसंकल्पावर रु. ४ लाख ८४ हजार ९१ कोटी अंदाजित करण्यात आले असून त्या तुलनेत महिला व बाल विकास विभागाचा अर्थसंकल्प रु.३ हजार ८२० कोटींचा आहे. एकूण राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत विभागाचे प्रमाण आतापर्यंतचे सर्वात कमी असून ते ०.७९% आहे.

# एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची अंमलबजावणी

'एकात्मिक बाल विकास सेवा योजना' ही योजना मुख्यत्वे करून बालकांच्या भविष्यविषयक दर्जात सुधारणा करण्यासाठी तसेच बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने सन १९७५-७६मध्ये टप्प्या-टप्प्याने सुरू करण्यात आली.

**योजनेची उद्दिष्ट्ये:** एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही प्रकल्पाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. ग्रामीण आदिवासी व नागरी अशा तीन क्षेत्रात तिची विभागणी करण्यात आली आहे. सदर योजनेची मुख्य उद्दिष्ट्ये १) ० ते ६ वर्षे वयोगटातील मुलांचा पोषण व आरोग्य विषयक दर्जा सुधारणे २) मुलांच्या योग्य मानसिक, शारीरिक व सामाजिक विकासाचा पाया घालणे, ३) बालमृत्यू व बाल रोगाचे कुपोषणाचे प्रमाण कमी करणे, ४) बाल विकासाला चालना मिळावी म्हणून विविध विभागांमध्ये धोरण व अंमलबजावणी याबाबत परिणामकारक समन्वय साधणे. तसेच ५) योग्य अशा पोषण व आरोग्यविषयक शिक्षणाद्वारे बालकांचे सर्वसामान्य आरोग्य व त्यांच्या पोषणविषयक गरजांकडे लक्ष पुरविण्यासाठी मातांची क्षमता वाढ करणे.

**योजनेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सेवा:** १) पूरक पोषण आहार ६ महिने ते ६ वर्षे मुले, गरोदर स्त्रिया व स्तनदा माता, २) लसीकरण, ३) आरोग्य तपासणी, ४) संदर्भ आरोग्य सेवा, ५) ३ ते ६ वर्षातील मुलांचे अनौपचारिक शिक्षण तसेच ६) वय वर्षे १५ ते ४५ वर्षे वयोगटातील स्त्रियांचे आरोग्य आणि सकस आहार विषयक शिक्षण.

**एकात्मिक सेवा योजनेच्या यंत्रणेची भूमिका, कर्तव्य व जबाबदाऱ्या:**

१. **बाल विकास प्रकल्प अधिकारी:** एकात्मिक बाल विकास प्रकल्पाचा संपूर्ण कारभार बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांवर असतो. त्यामुळे प्रकल्पाची योजना बनविण्यासाठी व ती राबविण्यासाठी संपूर्णत: जबाबदार असतो.

२. **पर्यवेक्षिका:** बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्याच्या मदतीला पर्यवेक्षिकेचा एक गट असतो. जो अंगणवाडी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व त्यांच्या कामाचे पर्यवेक्षण करीत असतो. ग्रामीण शहरी व आदिवासी प्रकल्पांमध्ये २५ अंगणवाडी कार्यकर्त्यांचे पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी एका पर्यवेक्षिकेची असते.

३. **अंगणवाडी सेविका:** अंगणवाडी म्हणजे कोणतेही गाव, झोपडपट्टीमध्ये असलेल्या कोणाच्याही घराच्या अंगणात एकात्मिक बाल विकास प्रकल्प योजनेअंतर्गत मुले व माता यांना एकत्रित सेवा उपलब्ध करून देण्याचे केंद्र होय. ग्रामीण व शहरी भागातील ४००-८०० लोकसंख्येकरिता व आदिवासी भागातील ३००-८०० लोकसंख्येकरिता अंगणवाड्या स्थापन करण्यात येतात. तसेच ग्रामीण भागातील १५०-४०० लोकसंख्येकरिता व आदिवासी भागातील १५०-३०० लोकसंख्येकरिता मिनी अंगणवाड्या

स्थापन करण्यात येतात. या अंगणवाडी केंद्राची संपूर्ण जबाबदारी अंगणवाडी सेविकेची असते. त्यामुळे अंगणवाडी सेविकेच्या कार्यावर त्या अंगणवाडीचे यश अवलंबून असते. आजच्या घडीला ९३ हजार ४३२ अंगणवाडी सेविका व ११ हजार २९४ मिनी अंगणवाडी सेविकांची पदे भरली गेली आहेत.

४. **एकात्मिक बाल विकास प्रकल्प व अंगणवाडी केंद्र:** राज्यामध्ये एकूण ५५३ प्रकल्प मंजूर असून त्यापैकी ३६४ ग्रामीण, ८५ आदिवासी व १०४ नागरी प्रकल्पांचा समावेश आहे. या प्रकल्पांतर्गत ६५ हजार ८२६ ग्रामीण, १६ हजार १४ आदिवासी, १० हजार ३५७ नागरी अशा एकूण ९२ हजार १९७ अंगणवाडी केंद्रांचा समावेश आहे. तसेच ९ हजार ५६२ ग्रामीण व २ हजार १९३ आदिवासी अशा एकूण ११ हजार ७५५ मिनी अंगणवाड्या कार्यरत आहेत.

## पोषण आहार योजनांची सद्यस्थिती

राज्यात महिला व बाल विकास विभागाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमार्फत 'पूरक पोषण आहार योजना' तर शालेय शिक्षण विभागाच्या प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत 'शालेय पोषण आहार योजना' राबविण्यात येतात, लाभार्थ्यांचे पोषण व्हावे, त्यांचे कुपोषण होऊ नये हा त्यामागचा मुख्य उद्देश असून या योजना केंद्र पुरस्कृत असून केंद्र सरकारचा मोठा वाटा या योजनांसाठी असतो, केंद्र व राज्य शासन संयुक्तरित्या या योजनेसाठी निधी देते. सध्या या दोन्ही योजनांसाठी लागणाऱ्या अन्नधान्याच्या पुरवठा करण्याची जबाबदारी 'महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ, मर्या. मुंबई (महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झुमर्स फेडरेशन लि., मुंबई) यांच्याकडे देण्यात आलेली आहे. या दोन्ही योजनांच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्याचा प्रयत्न या अहवालात केला आहे.

### पूरक पोषण आहार योजना:

पूरक पोषण आहार योजना ही एक जुनी केंद्र पुरस्कृत योजना असून **'आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना', नवी मुंबई** मार्फत ती वर्ष १९७५ पासून राबविली जात आहे. राज्यातील ग्रामीण, आदिवासी व नागरी भागातील लाभार्थ्यांना या योजनेंतर्गत तयार ताजा आहार (HCM) दिला जात होता. त्यानंतर त्यात बदल करत, पूरक पोषण आहारामध्ये खंड पडू नये म्हणून पावसाळ्यामध्ये अतिदुर्गम व आदिवासी क्षेत्रामध्ये घरी घेऊन खाण्यासाठी, घरपोच आहार (THR) सुरू करण्यात आला.

**योजनेच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती**:

पूरक पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणीची मुख्य जबाबदारी आहार व अन्नधान्य पोहोचविण्याचे काम राज्यातील निरनिराळ्या १८ संस्थांकडे सोपविण्यात आले होते. मात्र या संस्थांच्या विरोधात मान. सर्वोच्च

न्यायालयात अपिल करण्यात आले त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने दि. २६ फेब्रुवारी २०१९ रोजीच्या आदेशानुसार वरील १८ संस्थांचे पूरक पोषण आहार पुरविण्याचे काम थांबविण्यास सांगितले, तसेच १० दिवसाच्या आत पर्यायी व्यवस्था उभी करण्याचे निर्देश दिले.

**योजनेच्या अंमलबजावणीची (कच्चे धान्य पुरवठा) जबाबदारी:**

**मान. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर लगेचच 'आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना', नवी मुंबई यांच्या पत्रानुसार शासनाने 'महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ, मर्या. मुंबई (महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झुमर्स फेडरेशन लि., मुंबई) या निम शासकीय संस्थेला कच्चे धान्य पुरविण्याची जबाबदारी दिली आहे.** एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील लाभार्थ्यांना त्यांच्या वयोगटानुसार शासनाने निर्धारित केलेल्या दरानुसार, (६ महिने ते ३ वर्षाची बालके प्रती लाभार्थी प्रती दिन रु. ८, गर्भवती महिला, स्तनदा माता व किशोरवयीन मुली यांना प्रती लाभार्थी प्रती दिन रु. ९.५० व कुपोषित बालकांना प्रती लाभार्थी प्रती दिन रु. १२) कच्चे धान्य पुरवठ्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच भविष्यात ज्या तारखेला ज्या ठिकाणी संबंधित बचत गटांची ३ वर्षाची मुदत संपेल त्या तारखेपासून THR ऐवजी ग्राहक फेडरेशन मार्फतच कच्चे धान्य पुरवठा करण्याची मान्यता शासनाने दिली आहे. तसेच नवीन निविदा मंजूर होऊन सुरू होईपर्यंत सदर पर्यायी व्यवस्था सुरू राहणार आहे.

## १.३ पोषण आहार योजना मागील ५ वर्षात अर्थसंकल्पीत निधी व झालेला खर्च:

**तक्ता क्र. २** *(रुपये कोटीत)*

**पोषण आहार योजना (शीर्ष: २२३६ व ४२३६)**

| वर्ष | अर्थसंकल्पीय अंदाज | प्रत्यक्ष खर्च | अर्थसंकल्पाच्या तुलनेत खर्चातील वाढ/घट (-/+) | अर्थसंकल्पाच्या तुलनेत खर्चातील वाढ/घट (%) | अर्थसंकल्पाच्या तुलनेत प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|---|
| २०२१-२२ | ३,५२०.०१ | - | - | - | - |
| २०२०-२१ | ३,२१५.४५ | ५,२०८.५३ | १,९९३.०८ | ६१.९८ | १६१.९८ |
| २०१९-२० | २,६८२.३२ | ४,१६१.०७ | १,४७८.७५ | ५५.१३ | १५५.१३ |
| २०१८-१९ | २,९९६.३८ | ३,७४७.५७ | ७५१.१९ | २५.०७ | १२५.०७ |
| २०१७-१८ | २,०३२.७२ | २,५४८.०२ | ५१५.३० | २५.३५ | १२५.३५ |
| २०१६-१७ | १,३४०.७० | २,५०७.७४ | १,१६७.०४ | ८७.०४ | १८७.०४ |

**(स्त्रोत:** *खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज, खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा वर्ष २०१६-१७ ते २०२१-२२)*

**टीप:** *वर्ष २०२१-२१ मध्ये प्रत्यक्ष खर्च आला नसल्याने सुधारित अंदाज दिलेले आहेत.*

☞ वर्ष २०२१-२२ मध्ये पूरक पोषण आहारासाठी ३ हजार ५२० कोटी रुपयांचा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

☞ वर्ष २०२०-२१ मध्ये पूरक पोषण आहारासाठी ३ हजार २१५ कोटी ४५ लाखांचा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता त्या तुलनेत सुधारित अंदाजात १ हजार ९९३ कोटी ८ लाख (६१.९८%) रुपयांची वाढ झाली असून खर्चाचे सुधारित अंदाज ५ हजार २०८ कोटी ५३ लाख (१६१.९८%) रुपये झाले आहेत.

☞ वर्ष २०१९-२० मध्ये पूरक पोषण आहारासाठी २ हजार ६८२ कोटी ३२ लाख रुपयांचा निधी अर्थसंकल्पीत केला होता, त्या तुलनेत प्रत्यक्ष खर्च ४ हजार १६१ कोटी ७ लाख (१५५.१३%) रुपये झाला होता. याचाच अर्थ खर्चात १ हजार ४७८ कोटी ७५ लाख (५५.१३%) रुपयांची वाढ झाली.

☞ वर्ष २०१८-१९ मध्ये पूरक पोषण आहारासाठी २ हजार ९९६ कोटी ३८ लाख रुपयांचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता, त्या तुलनेत ३ हजार ७४७ कोटी ५७ लाख (१२५.०७%) रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. खर्चात ७५१ कोटी १९ लाख (२५.०७%) रुपयांची वाढ झाली होती.

☞ वर्ष २०१७-१८ मध्ये पूरक पोषण आहारासाठी २ हजार ३२ कोटी ७२ लाख रुपयांचा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता. त्या तुलनेत २ हजार ५४८ कोटी २ लाख (१२५.३५%) रुपयांचा निधी खर्च झाला होता. अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत खर्चात ५१५ कोटी ३० लाख (२५.३५%) रुपयाने वाढ झाली होती.

☞ वर्ष २०१६-१७ मध्ये पूरक पोषण आहारासाठी १ हजार ३४० कोटी ७० लाख रुपयांचा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता. त्या तुलनेत २ हजार ५०७ कोटी ७४ लाख (१८७.०४%) रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत खर्च १ हजार १६७ कोटी ४ लाख (८७.०४%) रुपयांनी अधिकचा होता.

## 'पूरक पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणीत' अंगणवाड्यांचे स्थान!

अंगणवाडी म्हणजे कोणतेही गाव, झोपडपट्टी मध्ये असलेल्या कोणाच्याही घराच्या अंगणात एकात्मिक बाल विकास प्रकल्पाच्या अंतर्गत मुले व माता यांना एकत्रित सेवा उपलब्ध करून देण्याचे केंद्र होय. आता या केंद्राची व्याप्ती वाढविण्यात आली असून अंगणवाड्यांचे स्वतंत्र बांधकाम केले जाते. त्यामध्ये पुरेशी अंतर्गत जागा, पिण्याच्या पाण्याची सुविधा, अंगणवाडीतील साहित्य मुलांची खेळणी ठेवण्यासाठी वेगळी खोली, स्वयंपाकगृह, स्वच्छतागृह तसेच अंगणवाडीबाहेर मुलांना खेळण्यासाठी मोकळे मैदान या धर्तीवर अंगणवाड्या

तयार केल्या जात आहेत. काही अंगणवाड्या डिजिटल शाळांच्या धर्तीवर डिजिटल करण्यात आल्या आहेत. त्यामुळे या योजनेत अंगणवाडीला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

ग्रामीण व शहरी भागातील ४०० ते ८०० लोकसंख्येकरिता व आदिवासी भागातील ३००-८०० लोकसंख्येकरिता अंगणवाड्या स्थापन करण्यात येतात. तसेच ग्रामीण भागातील १५० ते ४०० लोकसंख्येकरिता व आदिवासी भागातील १५० ते ३०० लोकसंख्येकरिता मिनी अंगणवाड्या स्थापन करण्यात येतात. मात्र आजही या अंगणवाड्यांना पुरेशा मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध नसणे, अंगणवाड्या शासनाच्या मालकीच्या नसणे, अंगणवाड्यांचे बांधकाम पक्के नसणे, पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नसणे, अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. राज्यात १ लाख ३ हजार ९५२ अंगणवाड्या कार्यरत असून त्यापैकी २९ हजार ९३० अंगणवाड्या या भाड्याच्या जागेत चालतात तर २१ हजार ३१० अंगणवाड्या या खाजगी मालकीच्या आहेत. आजही ६ हजार ७४२ अंगणवाड्या या उघड्यावर मोकळ्या जागेत भरवल्या जातात. त्यापैकी ग्रामाण भागातील अंगणवाड्यांची संख्या ५ हजार ३५० इतकी मोठी आहे. अंगणवाड्यांची स्थिती पावसाळ्यात बिकट असते. अशा वेळी अनेक ठिकाणी या अंगणवाड्या घरात भरवल्या जातात किंवा बंद ठेवल्या जातात. राज्यातील २ हजार ७२१ अंगणवाड्यांमधून आजही पिण्याच्या पाण्याची कोणतीही सोय उपलब्ध नाही. ४७ हजार ४३९ अंगणवाड्यांमध्ये वापरण्यायोग्य शौचालय नाहीत, ६३ हजार ३५० अंगणवाड्यांमध्ये स्वतंत्र स्वयंपाकघर नाही, २९ हजार ५८१ अंगणवाड्यांमध्ये मुलांना बसण्यासाठी पुरेशी अंतर्गत जागा नाही, ३५ हजारापेक्षा जास्त अंगणवाड्यांमध्ये मुलांना खेळण्यासाठी बाहेर मोकळे मैदान नाही. तर अनेक अंगणवाड्या या पावसाळ्यात गळत असल्याने मुले अंगणवाड्यात बसू शकत नाहीत अशी गंभीर स्थिती आहे.




***

## २.१ विभागनिहाय अंगणवाड्या/मिनी अंगणवाड्या:

तक्ता क्र. ३

| विभाग | ग्रामीण अंगणवाड्या | ग्रामीण मिनी अंगणवाड्या | आदिवासी अंगणवाड्या | आदिवासी मिनी अंगणवाड्या | नागरी अंगणवाड्या | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| कोकण | ७,०५६ | १,५३७ | ३,२९२ | ८०० | १,९४१ | १४,६२६ |
| नाशिक | १०,७७४ | १,१०२ | ६,५५० | ४८४ | १,१५४ | २०,०६४ |
| पुणे | १७,०२१ | २,९७३ | ५२६ | ९ | २,६०७ | २३,१३६ |
| औरंगाबाद | १५७९८ | २,५२४ | ४९९ | ११६ | १,६७१ | २०,६०८ |
| अमरावती | ८,८२८ | ७२९ | ९६६ | ८५ | १,२९७ | ११,९०५ |
| नागपूर | ६,३४९ | ६९७ | ४,१८१ | ६९९ | १,६८७ | १३,६१३ |
| एकूण | ६५,८२६ | ९,५६२ | १६,०१४ | २,१९३ | १०,३५७ | १,०३,९५२ |

(स्त्रोत: *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल*)

टीप: *कोकण विभागात मुंबई व मुंबई उपनगराचा समावेश नाही.*

☞ राज्यात १ लाख ३ हजार ९५२ अंगणवाड्या व मिनी अंगणवाड्या कार्यरत असून, त्यापैकी ग्रामीण भागात ७५ हजार ३८८(७२.५२%), आदिवासी भागात १८ हजार २०७ (१७.५१%) तर नागरी भागात १० हजार ३५७ (९.९६%) आहेत.

☞ राज्यातील १ लाख ३ हजार ९५२ अंगणवाड्यांपैकी ९२ हजार १९७ (८८.६९%) अंगणवाड्या तर ११ हजार ७५५ (११.३१%) मिनी अंगणवाड्या कार्यरत आहेत.

☞ राज्यात एकूण १ लाख ३ हजार ९५२ अंगणवाड्यांपैकी पैकी सर्वात जास्त २३ हजार १३६ (२२.२६%) अंगणवाड्या पुणे विभागात तर सर्वात कमी ११ हजार ९०५ (११.४५%) अमरावती विभागात आहेत.


☞ राज्यातील आदिवासी भागात १८ हजार २०७ अंगणवाड्या कार्यरत असून त्यापैकी सर्वात जास्त नाशिक विभागात ७ हजार ३४ (३८.६३%) अंगणवाड्या आहेत.

☞ राज्यातील ग्रामीण भागात ७५ हजार ३८८ अंगणवाड्या कार्यरत असून त्यापैकी १९ हजार ९९४ (२६.५२%) अंगणवाड्या एकट्या पुणे विभागात आहेत.

☞ राज्यातील नागरी भागात १० हजार ३५७ अंगणवाड्या कार्यरत असून त्यापैकी सर्वात जास्त २ हजार ६०७ (२५.१७%) पुणे विभागात आहेत.

## २.२ इमारतीच्या मालकीच्या प्रकारानुसार अंगणवाड्यांची विभागनिहाय टक्केवारी :

आलेख क्र. २




(स्त्रोत: *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल*)

☞ पुणे विभागात ४०%, नागपूर विभागात ३०% औरंगाबाद विभागात २९%, कोकण विभागात २८%, नाशिक विभागात २२%, अमरावती विभागात १८% तर संपूर्ण राज्यात अंगणवाड्या या भाडेतत्त्वावर चालतात.

☞ अमरावती विभागात ६५%, नागपूर ५७%, औरंगाबाद ५६%, नाशिक ४९%, कोकण ४२%, तर पुण्यातील ४१% अंगणवाड्या या राज्य शासन किंवा ग्रामपंचायतीच्या मालकीच्या आहेत.

☞ कोकण ३०%, नाशिक २९%, पुणे १९%, अमरावती १७%, औरंगाबाद १५% तर नागपूर १३% अंगणवाड्या या इतर स्वरुपाच्या आहेत.



## २.३ इमारतीच्या मालकीच्या प्रकारानुसार अंगणवाड्या व टक्केवारी:

तक्ता क्र.४

| मालकीचा | ग्रामीण | % | आदिवासी | % | नागरी | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राज्य शासन/ ग्रामपंचायत | ३९,२३२ | ६०.०० | ११,२२६ | ७०.१० | ६५३ | ०६.३० | ५१,१११ | ५५.४३ |
| भाडेतत्त्वावर | ८,२९४ | १२.६० | ६०८ | ३.८० | ९,४३५ | ९१.०९ | १८,३३७ | १९.८९ |
| सामुदायिक | ३,५५५ | ५.४० | ८१७ | ५.१० | ११४ | ०१.१० | ४,४८६ | ४.८७ |
| प्राथमिक शाळा | ६,८४६ | १०.४० | ४०० | २.५० | ० | ०.०० | ७,२४६ | ७.८६ |
| इतर | ७,८९९ | १२.०० | २,९६३ | १८.५० | १५५ | १.५० | ११,०१७ | ११.९५ |
| एकूण | ६५,८२६ | १००.०० | १६,०१४ | १०.०० | १०,३५७ | १००.०० | ९२,१९७ | १००.०० |

(स्त्रोत: *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल*)

☞ राज्यात ९२ हजार १९७ अंगणवाड्या कार्यरत असून त्यापैकी ६५ हजार ८२६ (७१.४०%) ग्रामीण भागात, १६ हजार १४ (१७.३७%) आदिवासी भागात तर १० हजार ३५७ (११.२३%) नागरी भागात आहेत.

☞ राज्यातील एकूण ९२ हजार १९७ अंगणवाड्यांपैकी ५१ हजार १११ (५५.४३%) राज्य शासन व ग्रामपंचायतीच्या मालकीच्या आहेत.

☞ राज्यातील एकूण ९२ हजार १९७ अंगणवाड्यांपैकी १८ हजार ३३७ (१९.८९%) अंगणवाड्या या भाड्याच्या जागेत भरतात.

☞ राज्यातील १० हजार ३५७ अंगणवाड्या या नागरी भागात असून त्यापैकी ९ हजार ४३५ अंगणवाड्या या भाड्याच्या जागेत भरत आहेत.

☞ राज्यातील २२ हजार ७४९ (२४.६७%) आंगणवाड्या या सामुदायिक, प्राथमिक शाळा व इतर ठिकाणी भरत आहेत.

## २.४ अंगणवाड्यांच्या बांधकामाच्या प्रकारानुसार अंगणवाड्यांची संख्या व टक्केवारी:

**तक्ता क्र.५**

| बांधकामाचा प्रकार | ग्रामीण | % | आदिवासी | % | नागरी | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पक्का | ५२,७९२ | ८०.२० | १२,१८७ | ७६.१० | ७,१७७ | ६९.३० | ७२,१५६ | ७८.२६ |
| अर्ध-पक्का | ६,७१४ | १०.२० | १,२९७ | ८.१० | २,६१० | २५.२० | १०,६२१ | ११.५२ |
| कच्चा | २,०४१ | ३.१० | १,४७३ | ९.२० | ५७० | ५.५० | ४,०८४ | ४.४३ |
| मोकळी जागा | ४,२७९ | ६.५० | १,०५७ | ६.६० | ० | ०.०० | ५,३३६ | ५.७९ |
| एकूण | ६५,८२६ | १००.०० | १६,०१४ | १००.०० | १०,३५७ | १००.०० | ९२,१९७ | १००.०० |

(स्त्रोत: *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल*)

- ☞ राज्यात एकूण ९२ हजार १९७ अंगणवाड्या असून त्यापैकी ७२ हजार १५६ (७८.२६%) अंगणवाड्यांचे बांधकाम पक्क्या स्वरुपाचे आहे.
- ☞ राज्यातील १० हजार ६२१ (११.५२%) अंगणवाड्यांचे बांधकाम हे अर्धपक्क्या स्वरुपाच्या आहेत.
- ☞ राज्यातील ५ हजार ३३६ (५.७९%) अंगणवाड्या या आजही मोकळ्या जागेत भरतात.
- ☞ ४ हजार ८४ (४.४३%) अंगणवाड्यांचे बांधकाम कच्च्या स्वरुपाचे आहे.
- ☞ ग्रामीण भागातील ६५ हजार ८२६ आंगणवाड्यांपैकी ४ हजार २७९ (६.५०%) तर आदिवासी भागातील १६ हजार १४ अंगणवाड्यांपैकी १ हजार ५७ (६.६०%) अंगणवाड्या मोकळ्या जागेत भरतात.
- ☞ आदिवासी भागातील १ हजार ४७३ (९.२०%) अंगणवाड्यांचे बांधकाम कच्च्या स्वरुपाचे आहे.
- ☞ नागरी भागातील १० हजार ३५७ अंगणवाड्यांपैकी २ हजार ६१० (२५.२०%) अंगणवाड्यांचे बांधकाम हे अर्धपक्के स्वरुपाचे आहे.

## २.५ पिण्याच्या पाण्याच्या मुख्य स्त्रोतांनुसार अंगणवाड्या व त्यांची टक्केवारी:

तक्ता क्र. ६

| पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्त्रोत | ग्रामीण | % | आदिवासी | % | नागरी | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हात पंप | १५,९९६ | २४.३० | ६,३४२ | ३९.६० | ५८० | ५.६० | २२,९१८ | २४.८६ |
| नळाचे पाणी | २८,६३४ | ४३.५० | ३,९८७ | २४.९० | ६,७११ | ६४.८० | ३९,३३२ | ४२.६६ |
| विहीर | ११,७१७ | १७.८० | ३,९३९ | २४.६० | ५३९ | ५.२० | १६,१९५ | १७.५६ |
| तळे/नदी | २६३ | ०.४० | ८० | ०.५० | ४१ | ०.४० | ३८४ | ०.४२ |
| इतर | ७,८९९ | १२.०० | ८१७ | ५.१० | २,१७५ | २१.०० | १०,८९१ | ११.८१ |
| स्त्रोत उपलब्ध नाही | १,३१७ | २.०० | ८४९ | ५.३० | ३११ | ३.०० | २,४७७ | २.६९ |
| **एकूण** | **६५,८२६** | **१००.००** | **१६,०१४** | **१००.००** | **१०,३५७** | **१००.००** | **९२,१९७** | **१००.००** |

(स्त्रोत: *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल*)

- ☞ राज्यात ९२ हजार १९७ अंगणवाड्या असून त्यापैकी ३९ हजार ३३२ अंगणवाड्यांना नळाद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होता.
- ☞ २२ हजार ९१८ अंगणवाड्यांना हातपंपाद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध होते.
- ☞ विहिरीद्वारे १६ हजार १९५ अंगणवाड्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध होते.
- ☞ २ हजार ४७७ अंगणवाड्यांना पिण्याच्या पाण्याचा कोणताही स्त्रोत उपलब्ध नाही.
- ☞ ३८४ अंगणवाड्यांना नदी व तळ्याद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध होते.
- ☞ १० हजार ८९१ अंगणवाड्यांना इतर स्त्रोताद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध होते.
- ☞ राज्यात २ हजार ४७७ अंगणवाड्यांना पिण्याच्या पाण्याचा कोणताही स्त्रोत उपलब्ध नसून त्यापैकी ग्रामीण भागातील १ हजार ३१७ (५३.१७%), आदिवासी भागातील ८४९(३४.२८%), तर नागरी भागातील ३११(१२.५६%) अंगणवाड्यांचा समावेश आहे.
- ☞ राज्यातील ३८४ अंगणवाड्यांना पिण्याच्या पाण्यासाठी नदी व तळ्यावर अवलंबून राहावे लागत असून त्यापैकी ग्रामीण भागातील २६३ (६८.४९%), आदिवासी भागातील ८० (२०.८३%) तर नागरी भागातील ४१ (१०.६८%) अंगणवाड्यांचा समावेश आहे.
- ☞ राज्यातील १६ हजार १९५ अंगणवाड्यांना विहिरीद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असून ११ हजार ७१७ (७२.३५%) अंगणवाड्या या ग्रामीण भागातील, ३ हजार ९३९ (२४.३२%) अंगणवाड्या या आदिवासी भागातील तर ५३९ (३.३३%) अंगणवाड्या या नागरी भागातील आहेत.
- ☞ राज्यातील १० हजार ८९१ अंगणवाड्यांना हात पंप, नळाद्वारे, विहीर, नदी, तलाव यापैकी कोणत्याही स्त्रोताद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध होत नव्हते. त्यामुळे त्यांना टँकर, खड्ड्यामध्ये साठलेले पाणी अशा साधनांवर अवलंबून रहावे लागत होते. अशा ग्रामीण भागातील ७ हजार ८९९ (७२.५२%), नागरी भागातील २ हजार १७५ (१९.९७%) तर आदिवासी भागातील ८१७ (७.५०%) अंगणवाड्यांचा समावेश आहे.

## २.६ ग्रामीण क्षेत्रातील अंगणवाड्या उपलब्ध सोयी-सुविधा:

तक्ता क्र.७

| अंगणवाड्यांमधील मूलभूत सोयी-सुविधा | ग्रामीण क्षेत्रातील अंगणवाड्या (६५,८२६) | | | |
|---|---|---|---|---|
| | सुविधा असलेल्या | % | सुविधा नसलेल्या | % |
| पिण्याचे पाणी | ६४,५०९ | ९८.०० | १,३१७ | २.०० |
| वापरण्यायोग्य शौचालय | ३७,३२३ | ५६.७० | २८,५०२ | ४३.३० |
| स्वतंत्र साठवणूकीची जागा | ३१,९२६ | ४८.५० | ३३,९०० | ५१.५० |
| स्वतंत्र स्वयंपाकघर | २८,०४२ | ४२.६० | ३७,७८४ | ५७.४० |
| पुरेशी अंतर्गत जागा | ४९,७६४ | ७५.६० | १६,०६२ | २४.४० |
| खेळासाठी बाहेर मोकळे आंगण | ४७,०६६ | ७१.५० | १८,७६० | २८.५० |
| बैठ्या खेळाचे सामान | ३३,१७६ | ५०.४० | ३२,६५० | ४९.६० |

(स्त्रोत: *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल*)

- ☞ ग्रामीण क्षेत्रात एकूण ६५ हजार ८२६ अंगणवाड्या कार्यरत आहेत.
- ☞ ग्रामीण क्षेत्रातील १ हजार ३१७ (२%) अंगणवाड्यांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नाही.
- ☞ २८ हजार ५०२ (४३.३०%) अंगणवाड्यांना वापरण्यायोग्य शौचालये नाहीत.
- ☞ ३३ हजार ९०० (५१.५०%) अंगणवाड्यांना स्वतंत्र साठवणुकीची जागा नाही.
- ☞ ३७ हजार ७८४ (५७.४०%) अंगणवाड्यांना स्वतंत्र स्वयंपाकघर उपलब्ध नाही.
- ☞ १६ हजार ६२ (२४.४०%) अंगणवाड्यांमध्ये पुरेशी अंतर्गत जागा उपलब्ध नाही.
- ☞ १८ हजार ७६० (२८.५०%) अंगणवाड्यांमध्ये मुलांसाठी खेळासाठी मोकळे आंगण नाही.
- ☞ ३२ हजार ६५० (४९.६०%) अंगणवाड्यांमध्ये बैठ्या खेळाचे साहित्य उपलब्ध नाही.

## २.७ आदिवासी क्षेत्रातील अंगणवाड्या उपलब्ध सोयी-सुविधा:

तक्ता क्र. ८

| अंगणवाड्यांमधील मूलभूत सोयी-सुविधा | आदिवासी क्षेत्रातील अंगणवाड्या (१६,०१४) | | | |
|---|---|---|---|---|
| | सुविधा असलेल्या | % | सुविधा नसलेल्या | % |
| पिण्याचे पाणी | १५,१६५ | ९४.७० | ८४९ | ०५.३० |
| वापरण्यायोग्य शौचालय | ७,८४७ | ४९.०० | ८,१६७ | ५१.०० |
| स्वतंत्र साठवणुकीची जागा | ८,८२४ | ५५.१० | ७,१९० | ४४.९० |
| स्वतंत्र स्वयंपाकघर | ६,९९८ | ४३.७० | ९,०१६ | ५६.३० |
| पुरेशी अंतर्गत जागा | १२,२२६ | ७६.३५ | ३,७८८ | २३.६५ |
| खेळासाठी बाहेर मोकळे आंगण | ११,४९८ | ७१.८० | ४,५१६ | २८.२० |
| बैठ्या खेळाचे सामान | ९,३५२ | ५८.४० | ६,६६२ | ४१.६० |

(स्त्रोत: *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल*)

☞ आदिवासी क्षेत्रात एकूण १६ हजार १४ अंगणवाड्या कार्यरत आहेत.

☞ आदिवासी क्षेत्रातील ८४९ (५.३०%) अंगणवाड्यांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नाही.

☞ आदिवासी क्षेत्रातील ८ हजार १६७ (५१%) अंगणवाड्यांना वापरण्यायोग्य शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही.

☞ आदिवासी क्षेत्रातील ७ हजार १९० (४४.९०%) अंगणवाड्यांना स्वतंत्र साठवणुकीसाठी जागा उपलब्ध नाही.

☞ आदिवासी क्षेत्रातील ९ हजार १६ (५६.३०%) अंगणवाड्यांना स्वतंत्र स्वयंपाकघर नाही.

☞ आदिवासी क्षेत्रातील ३ हजार ७८८ (२३.६५%) अंगणवाड्यांमध्ये मुलांना बसण्यासाठी पुरेशी अंतर्गत जागा उपलब्ध नाही.

☞ आदिवासी क्षेत्रातील ४ हजार ५१६ (२८.२०%) अंगणवाड्यांमध्ये खेळासाठी बाहेर मोकळे आंगण उपलब्ध नाही.

☞ आदिवासी क्षेत्रातील ६ हजार ६६२ (४१.६०%) अंगणवाड्यांमध्ये मुलांना खेळण्यासाठी बैठ्या खेळांचे सामान दिले गेलेले नाही.

## २.८ नागरी क्षेत्रातील अंगणवाड्या उपलब्ध सोयी-सुविधा:

**तक्ता क्र. ९**

| अंगणवाड्यांमधील मूलभूत सोयी-सुविधा | नागरी क्षेत्रातील अंगणवाड्या (१०,३५७) | | | |
|---|---|---|---|---|
| | सुविधा असलेल्या | % | सुविधा नसलेल्या | % |
| पिण्याचे पाणी | १०,०४६ | ९७.०० | ३११ | ३.०० |
| वापरण्यायोग्य शौचालय | ५,६०३ | ५४.१० | ४,७५४ | ४५.९० |
| स्वतंत्र साठवणूकीची जागा | ३,९४६ | ३८.१० | ६,४११ | ६१.९० |
| स्वतंत्र स्वयंपाकघर | ५३९ | ५.२० | ९,८१८ | ९४.८० |
| पुरेशी अंतर्गत जागा | ४,५९८ | ४४.४० | ५,७५८ | ५५.६० |
| खेळासाठी बाहेर मोकळे आंगण | २,४१३ | २३.३० | ७,९४४ | ७६.७० |
| बैठ्या खेळाचे सामान | ५,९०३ | ५७.०० | ४,४५४ | ४३.०० |

(**स्त्रोत:** *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल*)

☞ नागरी क्षेत्रात १० हजार ३५७ अंगणवाड्या कार्यरत आहेत.

☞ नागरी क्षेत्रातील ३११ (३%) अंगणवाड्यांमध्ये पिण्याच्या पाणी सोय उपलब्ध नाही.

☞ नागरी क्षेत्रातील ४ हजार ७५४ (४५.९०%) अंगणवाड्यांमध्ये वापरण्यायोग्य शौचालय उपलब्ध नाही.

☞ नागरी क्षेत्रातील ६ हजार ४११ (६१.९०%) अंगणवाड्यांमध्ये स्वतंत्र साठवणुकीची जागा उपलब्ध नाही.

☞ नागरी क्षेत्रातील ९ हजार ८१८ (९४.८०%) अंगणवाड्यांमध्ये स्वतंत्र स्वयंपाकघर उपलब्ध नाही.

☞ नागरी क्षेत्रातील ५ हजार ७५८ (५५.६०%) अंगणवाड्यांमध्ये मुलांना बसण्यासाठी पुरेशी अंतर्गत जागा उपलब्ध नाही.

☞ नागरी क्षेत्रातील ७ हजार ९४४ (७६.७०%) अंगणवाड्यांमध्ये खेळासाठी बाहेर मोकळे आंगण उपलब्ध नाही.

☞ नागरी क्षेत्रातील ४ हजार ४५४ (४३%) अंगणवाड्यांमध्ये मुलांना खेळण्यासाठी बैठ्या खेळांचे साहित्य उपलब्ध नाही.

## २.९ राज्यातील एकूण अंगणवाड्या उपलब्ध सोयी-सुविधा:

**तक्ता क्र.१०**

| अंगणवाड्यांमधील मूलभूत सोयी-सुविधा | एकूण अंगणवाड्या (९२,१९७) | | | |
|---|---|---|---|---|
| | सुविधा पूर्ण | % | विना सुविधा | % |
| पिण्याचे पाणी | ८९,७२० | ९७.३१ | २,४७७ | ०२.६९ |
| वापरण्यायोग्य शौचालय | ५०,७७३ | ५५.०७ | ४१,४२३ | ४४.९३ |
| स्वतंत्र साठवणूकीची जागा | ४४,६९६ | ४८.४८ | ४७,५०१ | ५१.५२ |
| स्वतंत्र स्वयंपाकघर | ३५,५७९ | ३८.५९ | ५,६१८ | ६१.४१ |
| पुरेशी अंतर्गत जागा | ६६,५८८ | ७२.२२ | २५,६०८ | २७.७८ |
| खेळासाठी बाहेर मोकळे आंगण | ६०,९७७ | ६६.१४ | ३१,२२० | ३३.८६ |
| बैठ्या खेळाचे सामान | ४८,४३१ | ५२.५३ | ४३,७६६ | ४७.४७ |

(**स्त्रोत**: *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल*)

☞ राज्यात एकूण ९२ हजार १९७ अंगणवाड्या कार्यरत आहेत.

☞ २ हजार ४७७ (२.६९%) अंगणवाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध नाही.

☞ ४१ हजार ४२३ (४४.९३%) अंगणवाड्यांमध्ये वापरण्यायोग्य शौचालय उपलब्ध नाही.

☞ ४७ हजार ५०१ (५१.५२%) अंगणवाड्यांमध्ये स्वतंत्र साठवणुकीची जागा उपलब्ध नही.

☞ ५६ हजार ६१८ (६१.४१%) अंगणवाड्यांमध्ये स्वतंत्र स्वयंपाकघर उपलब्ध नाही.

☞ २५ हजार ६०८ (२७.७८%) अंगणवाड्यांमध्ये मुलांना बसण्यासाठी पुरेशी अंतर्गत जागा नाही.

☞ ३१ हजार २२० (३३.८६%) अंगणवाड्यांमध्ये खेळासाठी बाहेर मोकळे आंगण नाही.

☞ ४३ हजार ७६६ (४७.४७%) अंगणवाड्यांमध्ये बैठ्या खेळांचे सामान उपलब्ध नाही.

***

## ३.१ इमारतीच्या मालकीच्या प्रकारानुसार मिनी अंगणवाड्या व टक्केवारी:

**तक्ता क्र.११**

| मालकीचा प्रकार | ग्रामीण | % | आदिवासी | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|
| राज्य शासन/ग्रामपंचायत | ३,९३० | ४१.१० | ७२६ | ३३.१० | ४,६५६ | ३९.६१ |
| भाडेतत्वावर | १,८७४ | १९.६० | १९५ | ८.९० | २,०६९ | १७.६० |
| सामुदायिक | ६०२ | ६.३० | १७८ | ८.१० | ७८० | ६.६४ |
| प्राथमिक शाळा | १,२७२ | १३.३० | ३५ | १.६० | १,३०७ | ११.१२ |
| इतर | १,८८४ | १९.७० | १,०५९ | ४८.३० | २,९४३ | २५.०३ |
| एकूण | ९,५६२ | १००.०० | २,१९३ | १००.०० | ११,७५५ | १००.०० |

(**स्त्रोत:** *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल)*

- ☞ राज्यात ११ हजार ७५५ मिनी अंगणवाड्या कार्यरत आहेत.
- ☞ राज्यातील एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी राज्य शासन व ग्रामपंचायतीच्या मालकीच्या ४ हजार ६५६ (३९.६१%) अंगणवाड्या आहेत.
- ☞ राज्यातील एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी २ हजार ६९ (१७.६०%) अंगणवाड्या या भाडेतत्त्वावर चालतात.
- ☞ राज्यातील एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ७८० (६.६४%) अंगणवाड्या या सामुदायिक स्वरुपाच्या आहेत.
- ☞ राज्यातील एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी १ हजार ३०७ (११.१२%) अंगणवाड्या या प्राथमिक शाळांमध्ये भरतात.
- ☞ राज्यातील एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी २ हजार ९४३ (२५.०३%) अंगणवाड्या या इतर स्वरुपाच्या मालकीच्या आहेत.

## ३.२ बांधकामाच्या प्रकारानुसार मिनी अंगणवाड्यांची संख्या व टक्केवारी:

**तक्ता क्र.१२**

| बांधकामाचा प्रकार | ग्रामीण | % | आदिवासी | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|
| पक्का | ६,७६० | ७०.७० | १,१६७ | ५३.२० | ७,९२७ | ६७.४४ |
| अर्ध-पक्का | १,२७२ | १३.३० | १७८ | ८.१० | १,४५० | १२.३४ |
| कच्चा | ४५९ | ४.८० | ५१३ | २३.४० | ९७२ | ८.२७ |
| मोकळी जागा | १,०७१ | ११.२० | ३३५ | १५.३० | १,४०६ | ११.९६ |
| एकूण | ९,५६२ | १००.०० | २,१९३ | १००.०० | ११,७५५ | १००.०० |

*(**स्त्रोत:** अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल)*

- ☞ राज्यात ११ हजार ७५५ मिनी अंगणवाड्या कार्यरत आहेत.
- ☞ एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ७ हजार ९२७ (६७.४४%) मिनी अंगणवाड्यांचे बांधकाम पक्के केलेले आहे.
- ☞ एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी १ हजार ४५० (१२.३४%) मिनी अंगणवाड्यांचे बांधकाम अर्ध-पक्के स्वरुपाचे आहे.
- ☞ एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ९७२ (८.२७%) मिनी अंगणवाड्यांचे बांधकाम कच्चे आहे.
- ☞ एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी १ हजार ४०६ (११.९६%) अंगणवाड्या या मोकळ्या जागेत भरतात.
- ☞ आदिवासी भागातील २ हजार १९३ मिनी अंगणवाड्यांपैकी ५१३ (२३.४०%) अंगणवाड्यांचे बांधकाम कच्च्या स्वरुपाचे असून ३३५ (१५.३०%) अंगणवाड्या या मोकळ्या जागेत भरतात.
- ☞ ग्रामीण भागातील ९ हजार ५६२ मिनी अंगणवाड्या असून त्यापैकी १ हजार ७१ (११.२०%) अंगणवाड्या या मोकळ्या जागेत भरतात.

## ३.३ पिण्याच्या पाण्याच्या मुख्य स्त्रोतांनुसार मिनी अंगणवाड्यांची संख्या व टक्केवारी:

**तक्ता क्र.१३**

| पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्त्रोत | ग्रामीण | % | आदिवासी | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|
| हात पंप | २,१९९ | २३.०० | ९७४ | ४४.४ | ३,१७३ | २६.९९ |
| नळाचे पाणी | ३,६४३ | ३८.१० | २३० | १०.५ | ३,८७३ | ३२.९५ |
| विहीर | २,१६१ | २२.६० | ८३१ | ३७.९० | २,९९२ | २५.४५ |
| इतर | १,३४८ | १४.१० | १२३ | ५.६० | १,४७१ | १२.५१ |
| स्त्रोत उपलब्ध नाही | २११ | २.२० | ३५ | १.६० | २४६ | २.०९ |
| एकूण | ९,५६२ | १००.०० | २,१९३ | १००.०० | ११,७५५ | १००.०० |

(**स्त्रोत:** *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल*)

- ☞ राज्यात ११ हजार ७५५ मिनी अंगणवाड्या कार्यरत आहेत.
- ☞ एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ३ हजार १७३ (२६.९९%) अंगणवाड्यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा हात पंपाद्वारे होतो.
- ☞ एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ३ हजार ८७३ (३२.९५%) अंगणवाड्यांना नळाद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो.
- ☞ एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी २ हजार ९९२ (२५.४५%) अंगणवाड्यांना विहिरीद्वारे पिण्याचे पाणी मिळते.

- ☞ एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी १ हजार ४७१ (१२.५१%) अंगणवाड्यांना इतर स्त्रोताद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो.
- ☞ एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी २४६ (२.०९%) अंगणवाड्यांना पिण्याच्या पाण्याचा कोणताही स्त्रोत उपलब्ध नाही.
- ☞ ग्रामीण भागात ९ हजार ५६२ मिनी अंगणवाड्या असून त्यापैकी २११ (२.२०%) अंगणवाड्यांना पिण्याच्या पाण्याचा कोणताही स्त्रोत उपलब्ध नाही.
- ☞ आदिवासी भागात २ हजार १९३ मिनी अंगणवाड्या असून त्यापैकी ३५ (१.६०%) अंगणवाड्यांना पिण्याच्या पाण्याचा कोणताही स्त्रोत उपलब्ध नाही.

## ३.४ ग्रामीण क्षेत्रातल्या मिनी अंगणवाड्या उपलब्ध सोयी-सुविधा :

**तक्ता क्र.१४**

| मिनी अंगणवाड्यांमधील मूलभूत सोयी-सुविधा | ग्रामीण क्षेत्रातील अंगणवाड्या (९,५६२) | | | |
|---|---|---|---|---|
| | सुविधा असलेल्या | % | सुविधा नसलेल्या | % |
| वापरण्यायोग्य शौचालय | ५,०६८ | ५३.०० | ४,४९४ | ४७.०० |
| स्वतंत्र साठवणुकीची जागा | ३,३२८ | ३४.८० | ६,२३४ | ६५.२० |
| स्वतंत्र स्वयंपाकघर | २,८३० | २९.६० | ६,७३२ | ७०.४० |
| बैठ्या खेळाचे सामान | ३,०५० | ३१.९० | ६,५१२ | ६८.१० |
| पुरेशी अंतर्गत जागा | ६,४८३ | ६७.८० | ३,०७९ | ३२.२० |
| खेळासाठी बाहेरील मोकळा परिसर | ६,५५० | ६८.५० | ३,०१२ | ३१.५० |

(**स्त्रोत**: *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल*)

- ☞ ग्रामीण भागात ९ हजार ५६२ मिनी अंगणवाड्या कार्यरत आहेत.
- ☞ ग्रामीण भागातील एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ४ हजार ४९४ (४७.००%) अंगणवाड्यांमध्ये वापरण्यायोग्य शौचालये नाहीत.
- ☞ ग्रामीण भागातील एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ६ हजार २३४ (६५.२०%) अंगणवाड्यांमध्ये स्वतंत्र साठवणुकीची जागा उपलब्ध नाही.
- ☞ ग्रामीण भागातील एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ६ हजार ७३२ (७०.४०%) अंगणवाड्यांमध्ये स्वतंत्र स्वयंपाकघर नाही.
- ☞ ग्रामीण भागातील एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ६ हजार ५१२ (६८.१०%) अंगणवाड्यांमध्ये मुलांना खेळण्यासाठी बैठ्या खेळांचे साहित्य उपलब्ध नाही.

☞ ग्रामीण भागातील एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ३ हजार ७९ (३२.२०%) अंगणवाड्यांमध्ये मुलांना बसण्यासाठी पुरेशी अंतर्गत जागा उपलब्ध नाही.

☞ ग्रामीण भागातील एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ३ हजार १२ (३१.५०%) अंगणवाड्यांमध्ये खेळासाठी बाहेर मोकळा परिसर नाही.

## ३.५ आदिवासी क्षेत्रातल्या मिनी अंगणवाड्या उपलब्ध सोयी-सुविधा:

**तक्ता क्र.१५**

| मिनी अंगणवाड्यांमधील मूलभूत सोयी-सुविधा | आदिवासी क्षेत्रातील मिनी अंगणवाड्या (२,१९३) | | | |
|---|---|---|---|---|
| | सुविधा असलेल्या | % | सुविधा नसलेल्या | % |
| वापरण्यायोग्य शौचालय | ६७१ | ३०.६० | १,५२२ | ६९.४० |
| स्वतंत्र साठवणूकीची जागा | ७९६ | ३६.३० | १,३९७ | ६३.७० |
| स्वतंत्र स्वयंपाकघर | ६०१ | २७.४० | १,५९२ | ७२.६० |
| बैठ्या खेळाचे सामान | ५८३ | २६.६० | १,६१० | ७३.४० |
| पुरेशी अंतर्गत जागा | १,३७९ | ६२.९० | ८१४ | ३७.१० |
| खेळासाठी बाहेरील मोकळा परिसर | १,४५० | ६६.१० | ७४३ | ३३.९० |

(स्त्रोत: *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल*)

☞ आदिवासी भागात २ हजार १९३ मिनी अंगणवाड्या कार्यरत आहेत.

☞ आदिवासी भागातील एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी १ हजार ५२२ (६९.४०%) अंगणवाड्यांमध्ये वापरण्यायोग्य शौचालये नाहीत.

☞ आदिवासी भागातील एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी १ हजार ३९७ (६३.७०%) अंगणवाड्यांमध्ये स्वतंत्र साठवणुकीची जागा उपलब्ध नाही.

☞ आदिवासी भागातील एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी १ हजार ५९२ (७२.६०%) अंगणवाड्यांमध्ये स्वतंत्र स्वयंपाकघर नाही.

☞ आदिवासी भागातील एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी १ हजार ६१० (७३.४०%) अंगणवाड्यांमध्ये मुलांना खेळण्यासाठी बैठ्या खेळांचे साहित्य उपलब्ध नाही.

☞ आदिवासी भागातील एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ८१४ (३७.१०%) अंगणवाड्यांमध्ये मुलांना बसण्यासाठी पुरेशी अंतर्गत जागा उपलब्ध नाही.

☞ आदिवासी भागातील एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ७४३ (३३.९०%) अंगणवाड्यांमध्ये खेळासाठी बाहेर मोकळा परिसर नाही.

## ३.६ राज्यातील एकूण मिनी अंगणवाड्या उपलब्ध सोयी-सुविधा:

**तक्ता क्र.१६**

| मिनी अंगणवाड्यांमधील मूलभूत सोयी-सुविधा | राज्यातील एकूण मिनी अंगणवाड्या (११,७५५) | | | |
|---|---|---|---|---|
| | सुविधा असलेल्या | % | सुविधा नसलेल्या | % |
| वापरण्यायोग्य शौचालय | ५,७३९ | ४८.८२ | ६,०१६ | ५१.१८ |
| स्वतंत्र साठवणूकीची जागा | ४,१२४ | ३५.०८ | ७,६३१ | ६४.९२ |
| स्वतंत्र स्वयंपाकघर | ३,४३१ | २९.१९ | ८,३२४ | ७०.८१ |
| बैठ्या खेळाचे सामान | ३,५५० | ३०.२० | ८,२०५ | ६९.८० |
| पुरेशी अंतर्गत जागा | ७,७८२ | ६६.२० | ३,९७३ | ३३.८० |
| खेळासाठी बाहेरील मोकळा परिसर | ७,९७० | ६७.८० | ३,७८५ | ३२.२० |

(**स्त्रोत**: *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल)*

- ☞ राज्यातील एकूण ११ हजार ७५५ मिनी अंगणवाड्या कार्यरत आहेत.
- ☞ एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ६ हजार १६ (६९.४०%) अंगणवाड्यांमध्ये वापरण्यायोग्य शौचालये नाहीत.
- ☞ एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ७ हजार ६३१ (६४.९२%) अंगणवाड्यांमध्ये स्वतंत्र साठवणुकीची जागा उपलब्ध नाही.
- ☞ एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ८ हजार ३२४ (७०.८१%) अंगणवाड्यांमध्ये स्वतंत्र स्वयंपाकघर नाही.
- ☞ एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ८ हजार २०५ (६९.८०%) अंगणवाड्यांमध्ये मुलांना खेळण्यासाठी बैठ्या खेळांचे साहित्य उपलब्ध नाही.
- ☞ एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ३ हजार ९७३ (३३.८०%) अंगणवाड्यांमध्ये मुलांना बसण्यासाठी पुरेशी अंतर्गत जागा उपलब्ध नाही.
- ☞ एकूण मिनी अंगणवाड्यांपैकी ३ हजार ७८५ (३२.२०%) अंगणवाड्यांमध्ये खेळासाठी बाहेर मोकळा परिसर नाही.

***

## २९ हजार अंगणवाड्यांना शैक्षणिक संच व खेळाचे साहित्य मिळालेलेच नाही

राज्यात १ लाख ३ हजार ९५२ अंगणवाड्या व मिनी अंगणवाड्या कार्यरत आहेत. या अंगणवाड्यांमधून ३ ते ६ वयोगटातील जी मुले आहेत. त्यांना अंगणवाड्यांमधून शालेय पूर्व शिक्षण दिले जाते, त्यांचा शैक्षणिक विकास व्हावा म्हणून शैक्षणिक व खेळाचे संच शासनामार्फत पुरविले जातात. मात्र २९ हजार ४९० अंगणवाड्यातील मुलांना हे संच प्राप्तच झालेले नाहीत. त्यापैकी सर्वात जास्त संख्या ही ग्रामीण भागातील आहे. ग्रामीण भागातील २२ हजार ८९ अंगणवाड्यांना शैक्षणिक व खेळाचे संच उपलब्ध झालेले नाहीत तर आदिवासी भागातील ५ हजार ४४४ अंगणवाड्यांना हे संच मिळालेले नाहीत. तर नागरी भागातील १ हजार ९५७ अंगणवाड्यांपर्यंत हे संच पोहोचलेले नाहीत असे पाहणीतून निदर्शनास आले आहे.



### ४. वय वर्षे ३ ते ६ वयोगटातील मुलांना राज्य शासनाकडून शैक्षणिक संच उपलब्ध झालेल्या व न झालेल्या अंगणवाड्यांची संख्या व टक्केवारी:

**तक्ता क्र. १७**

| तपशील | ग्रामीण | % | आदिवासी | % | नागरी | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राज्य शासनाकडून शैक्षणिक संच प्राप्त झालेल्या अंगणवाड्या | ५३,२९९ | ७०.७० | १२,७६३ | ७०.१० | ८,४०० | ८१.१० | ७४,४६२ | ७१.६३ |
| राज्य शासनाकडून शैक्षणिक संच प्राप्त न झालेल्या अंगणवाड्या | २२,०८९ | २९.३० | ५,४४४ | २९.१० | १,९५७ | १८.९० | २९,४९० | २८.३७ |
| **राज्यातील एकूण अंगणवाड्या** | ७५,३८८ | १००.०० | १८,२०७ | १००.०० | १०,३५७ | १००.०० | १,०३,९५२ | १००.०० |

(**स्रोत:** *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल)*

- ☞ राज्यातील १ लाख ३ हजार ९५२ अंगणवाड्या कार्यरत असून त्यापैकी ७४ हजार ४६२ (७१.६३%) अंगणवाड्यांतील ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांना राज्य शासनाकडून शैक्षणिक संच प्राप्त झाले होते, तर २९ हजार ४९० (२८.३७%) अंगणवाड्यांना शैक्षणिक संच मिळाले नाहीत.
- ☞ ग्रामिण भागात ७५ हजार ३८८ अंगणवाड्या कार्यरत असून त्यापैकी ५३ हजार २९९ (७०.७०%) अंगणवाड्यांतील ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांना शैक्षणिक संच प्राप्त झाले होते, तर २२ हजार ८९ (२९.३०%) अंगणवाड्यांमध्ये शैक्षणिक संच मिळाले नव्हते.
- ☞ आदिवासी भागात १८ हजार २०७ अंगणवाड्या कार्यरत असून त्यापैकी १२ हजार ७६३ (७०.१०%) अंगणवाड्यांतील ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांना शैक्षणिक संच प्राप्त झाले होते, तर ५ हजार ४४४ (२९.९०%) अंगणवाड्यांमध्ये शैक्षणिक संच मिळाले नव्हते.
- ☞ नागरी भागात १० हजार ३५७ अंगणवाड्या कार्यरत असून त्यापैकी ८ हजार ४०० (८१.१०%) अंगणवाड्यांतील ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांना शैक्षणिक संच प्राप्त झाले होते, तर १ हजार ९५७ (१८.९०%) अंगणवाड्यांमध्ये शैक्षणिक संच मिळाले नव्हते.

***

## अंगणवाड्यांमधून आरोग्य सुविधा पुरविण्याकडे शासनाचे दुर्लक्ष!

'एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे' मुख्य उद्दिष्ट्य राज्यातील ० ते ६ वर्षे वयोगटातील बालके, गर्भवती महिला व स्तनदा माता तसेच किशोरवयीन मुली यांचे आरोग्य सुधारणे त्यासाठी त्यांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देणे मात्र शासनाचे या महत्त्वाच्या सुविधा पुरविण्याकडे दुर्लक्ष होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. राज्यात १ लाख ३ हजार ९५२ अंगणवाड्या कार्यरत आहेत. या अंगणवाड्यांमध्ये लाभार्थ्यांना पूरक पोषण आहाराची नियमित उपलब्धता होणे, वजन काटा उपलब्ध असणे व तो सुस्थितीत असणे गरजेचे आहे. मानकानुसार औषध उपलब्ध असणे गरजेचे आहे. दर तीन महिन्यांनी एकदा वैद्यकीय पथकाने भेट देणे गरजेचे आहे. मुलांच्या नियमित आरोग्य नोंदी ठेवणे गरजेचे आहे. मुलांचे लसीकरण वेळोवेळी पूर्ण झालेले असले पाहिजे तसेच एखाद्या बालकाला व बालिकेला दुर्धर आजाराने गाठलेच तर वरच्या स्तरावर वैद्यकीय संस्थेत संदर्भ सेवेकरिता पाठवणे गरजेचे आहे. मात्र वरील सोयी-सुविधा अनेक अंगणवाड्यांमध्ये उपलब्ध होत नसल्याचे दिसून आले आहे.

६ हजार १२६ अंगणवाड्यांमध्ये पूरक पोषण आहार उपलब्ध होत नव्हता, २७ हजार ४५१ अंगणवाड्यांमध्ये वजन काटा सुस्थितीत नव्हता, ८१ हजार ८३३ अंगणवाड्यांमध्ये मानकानुसार औषधे उपलब्ध नव्हती, ६९ हजार ८६२ अंगणवाड्यांमध्ये पाहणी अगोदर तीन महिन्यात वैद्यकीय पथकाने भेट दिली नव्हती, ७ हजार ७५८ अंगणवाड्यांमध्ये मुलांच्या नियमित आरोग्य नोंदी ठेवल्या गेल्या नव्हत्या, ६ हजार

७९३ अंगणवाड्यांमध्ये मुलांचे लसीकरण पूर्ण केले गेले नव्हते तर २७ हजार ७५३ अंगणवाड्यांमध्ये आवश्यकता असणाऱ्या बालक-बालिकांना वरच्या स्तरावरील वैद्यकीय संस्थेमध्ये संदर्भ सेवेकरिता पाठविण्यातच आले नव्हते.






## ५.१ ग्रामीण क्षेत्रातील अंगणवाड्यांमध्ये पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधा:

**तक्ता क्र.१८**

| अंगणवाड्यांचा तपशील | ग्रामीण क्षेत्रातील अंगणवाड्या (७५,३८८) | | | |
|---|---|---|---|---|
| | सुविधा मिळालेल्या | % | सुविधा न मिळालेल्या | % |
| पूरक पोषण आहाराची नियमित उपलब्धता | ६९,९६० | ९२.८० | ५,४२८ | ७.२० |
| सुस्थितीत वजन काटा | ५७,६७१ | ७६.५० | १७,७१७ | २३.५० |
| मानकानुसार औषधे | ३०,४५७ | ४०.४० | ४४,९३१ | ५९.६० |
| मागील तीन महिन्यात वैद्यकीय पथकाची भेट | ४९,१५३ | ६५.२० | २६,२३५ | ३४.८० |
| वरच्या स्तरावरील वैद्यकीय संस्थेमध्ये संदर्भ सेवा | ५४,८८२ | ७२.८० | २०,५०६ | २७.२० |
| मुलांच्या नियमित आरोग्य नोंदी | ६९,२८२ | ९१.९० | ६,१०६ | ८.१० |
| मुलांचे लसीकरण | ७०,३३७ | ९३.३० | ५,०५१ | ६.७० |

(**स्त्रोत**: *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल*)

☞ ग्रामीण भागात ७५ हजार ३८८ अंगणवाड्या कार्यरत आहेत.

☞ ग्रामीण भागातील ५ हजार ४२८ (७.२०%) अंगणवाड्यांमध्ये पूरक पोषण आहाराची नियमित उपलब्धता होत नाही.

☞ ग्रामीण भागातील १७ हजार ७१७ (२३.५०%) अंगणवाड्यामध्ये वजन काटा सुस्थितीत नाही.

☞ ग्रामीण भागातील ४४ हजार १५३ (५९.६०%) अंगणवाड्यांमधून मानकानुसार औषधे उपलब्ध नव्हते.

☞ ग्रामीण भागातील २६ हजार २३५ (३४.८०%) अंगणवाड्यांमध्ये मागील ३ महिन्यात वैद्यकीय पथकाने भेट दिली नव्हती.

☞ ग्रामीण भागातील २० हजार ५०६ (२७.२०%) अंगणवाड्यांनी बालकांना वरच्या स्तरावरील वैद्यकीय संस्थेमध्ये संदर्भ सेवेकरिता पाठविलेले नसल्याचे आढळून आले.

☞ ग्रामीण भागातील ६ हजार १०६ (८.१०%) अंगणवाड्यांनी मुलांच्या नियमित आरोग्य नोंदी ठेवलेल्या नव्हत्या.

☞ ग्रामीण भागातील ५ हजार ५१ (६.७०%) अंगणवाड्यांनी मुलांचे लसीकरण पूर्ण केलेले नव्हते.

## ५.२ आदिवासी क्षेत्रातील अंगणवाड्यांना पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधा व पोषण आहार:

**तक्ता क्र.१९**

| अंगणवाड्यांचा तपशील | आदिवासी क्षेत्रातील अंगणवाड्या (१८,२०७) | | | |
|---|---|---|---|---|
| | सुविधा मिळालेल्या | % | सुविधा न मिळालेल्या | % |
| पूरक पोषण आहाराची नियमित उपलब्धता | १७,९३४ | ९८.५० | २७३ | १.५० |
| सुस्थितीत वजन काटा | १३,४५५ | ७३.९० | ४,७५२ | २६.१० |
| मानकानुसार औषधे | ८,७७६ | ४८.२० | ९,४३१ | ५१.८० |
| मागील तीन महिन्यात वैद्यकीय पथकाची भेट | १४,०५६ | ७७.२० | ४,१५१ | २२.८० |
| वरच्या स्तरावरील वैद्यकीय संस्थेमध्ये संदर्भ सेवा | १३,०७३ | ७१.८० | ५,१३४ | २८.२० |
| मुलांच्या नियमित आरोग्य नोंदी | १७,००५ | ९३.४० | १,२०२ | ६.६० |
| मुलांचे लसीकरण | १७,६९७ | ९७.२० | ५१० | २.८० |

(**स्त्रोत**: *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल*)

☞ आदिवासी भागात १८ हजार २०७ अंगणवाड्या कार्यरत आहेत.

☞ आदिवासी भागातील २७३ (१.५०%) अंगणवाड्यांमध्ये पूरक पोषण आहाराची नियमित उपलब्धता होत नाही.

☞ आदिवासी भागातील ४ हजार ७५२ (२६.१०%) अंगणवाड्यामध्ये वजन काटा सुस्थितीत नसल्याचे आढळून आले.

☞ आदिवासी भागातील ९ हजार ४३१ (५१.८०%) अंगणवाड्यांमधून मानकानुसार औषधे उपलब्ध नव्हते.

☞ आदिवासी भागातील ४ हजार १५१ (२२.८०%) अंगणवाड्यांमध्ये मागील ३ महिन्यात वैद्यकीय पथकाने भेट दिली नव्हती.

☞ आदिवासी भागातील ५ हजार १३४ (२८.२०%) अंगणवाड्यांनी बालकांना वरच्या स्तरावरील वैद्यकीय संस्थेमध्ये संदर्भ सेवेकरिता पाठविलेले नसल्याचे आढळून आले.

☞ आदिवासी भागातील १ हजार २०२ (६.६०%) अंगणवाड्यांनी मुलांच्या नियमित आरोग्य नोंदी ठेवलेल्या नव्हत्या.

☞ आदिवासी भागातील ५१० (२.८०%) अंगणवाड्यांनी मुलांचे लसीकरण पूर्ण केलेले नव्हते.

## ५.३ नागरी क्षेत्रातील अंगणवाड्यांना पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधा व पोषण आहार:

**तक्ता क्र.२०**

| अंगणवाड्यांचा तपशील | नागरी क्षेत्रातील अंगणवाड्या (१०३५७) | | | |
|---|---|---|---|---|
| | सुविधा मिळालेल्या | % | सुविधा न मिळालेल्या | % |
| पूरक पोषण आहाराची नियमित उपलब्धता | ९,९३२ | ९५.९० | ४२५ | ४.१० |
| सुस्थितीत वजन काटा | ५,३७५ | ५१.९० | ४,९८२ | ४८.१० |
| मानकानुसार औषधे | ४,५६७ | ४४.१० | ५,७९० | ५५.९० |
| मागील तीन महिन्यात वैद्यकीय पथकाची भेट | ६,७५३ | ६५.२० | ३,६०४ | ३४.८० |
| वरच्या स्तरावरील वैद्यकीय संस्थेमध्ये संदर्भ सेवा | ८,२४४ | ७९.६० | २,११३ | २०.४० |
| मुलांच्या नियमित आरोग्य नोंदी | ९,२०७ | ८८.९० | १,१५० | ११.१० |
| मुलांचे लसीकरण | ९,१२५ | ८८.१० | १,२३२ | ११.९० |

(**स्त्रोत**: *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल*)

☞ नागरी भागात १० हजार ३५७ अंगणवाड्या कार्यरत आहेत.

☞ नागरी भागातील ४२५ (४.१०%) अंगणवाड्यांमध्ये पूरक पोषण आहाराची नियमित उपलब्धता होत नाही.

☞ नागरी भागातील ४ हजार ९८२ (४८.१०%) अंगणवाड्यामध्ये वजन काटा सुस्थितीत नसल्याचे आढळून आले.

☞ नागरी भागातील ५ हजार ७९० (५५.९०%) अंगणवाड्यांमधून मानकानुसार औषधे उपलब्ध नव्हते.

☞ नागरी भागातील ३ हजार ६०४ (३४.८०%) अंगणवाड्यांमध्ये मागील ३ महिन्यात वैद्यकीय पथकाने भेट दिली नव्हती.

☞ नागरी भागातील २ हजार ११३ (२०.४०%) अंगणवाड्यांनी बालकांना वरच्या स्तरावरील वैद्यकीय संस्थेमध्ये संदर्भ सेवेकरिता पाठविलेले नसल्याचे आढळून आले.

☞ नागरी भागातील १ हजार १५० (११.१०%) अंगणवाड्यांनी मुलांच्या नियमित आरोग्य नोंदी ठेवलेल्या नव्हत्या.

☞ नागरी भागातील १ हजार २३२ (११.९०%) अंगणवाड्यांनी मुलांचे लसीकरण पूर्ण केलेले नव्हते.

## ५.४ राज्यातील एकूण अंगणवाड्यांमध्ये पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधा व पूरक पोषण आहार:

**तक्ता क्र.२१**

| अंगणवाड्यांचा तपशील | एकूण अंगणवाड्या (१,०३,९५२) | | | |
|---|---|---|---|---|
| | सुविधा असलेल्या | % | सुविधा न मिळालेल्या | % |
| पूरक पोषण आहाराची नियमित उपलब्धता | ९७,८२६ | ९४.११ | ६,१२६ | ५.८९ |
| सुस्थितीत वजन काटा | ७६,५०१ | ७३.५९ | २७,४५१ | २६.४१ |
| मानकानुसार औषधे | २२,११९ | २१.२८ | ८१,८३३ | ७८.७२ |
| मागील तीन महिन्यात वैद्यकीय पथकाची भेट | ६९,९६२ | ६७.३० | ३३,९९० | ३२.७० |
| वरच्या स्तरावरील वैद्यकीय संस्थेमध्ये संदर्भ सेवा | ७६,१९९ | ७३.३० | २७,७५३ | २६.७० |
| मुलांच्या नियमित आरोग्य नोंदी | ९६,१९४ | ९२.५४ | ७,७५८ | ७.४६ |
| मुलांचे लसीकरण | ९७,१५९ | ९३.४७ | ६,७९३ | ६.५३ |

☞ राज्यात एकूण १ लाख ३ हजार ९५२ अंगणवाड्या कार्यरत आहेत.

☞ एकूण अंगणवाड्यांपैकी ६ हजार १२६ (५.८९%) अंगणवाड्यांमध्ये पूरक पोषण आहाराची नियमित उपलब्धता होत नाही.

☞ एकूण अंगणवाड्यांपैकी २७ हजार ४५१ (२६.४१%) अंगणवाड्यामध्ये वजन काटा सुस्थितीत नसल्याचे आढळून आले.

☞ एकूण अंगणवाड्यांपैकी ८१ हजार ८३३ (७८.७२%) अंगणवाड्यांमधून मानकानुसार औषधे उपलब्ध नव्हते.

☞ एकूण अंगणवाड्यांपैकी ३३ हजार ९९० (३२.७०%) अंगणवाड्यांमध्ये मागील ३ महिन्यात वैद्यकीय पथकाने भेट दिली नव्हती.

☞ एकूण अंगणवाड्यांपैकी २७ हजार ७५३ (२६.७०%) अंगणवाड्यांनी बालकांना वरच्या स्तरावरील वैद्यकीय संस्थेमध्ये संदर्भ सेवेकरिता पाठविलेले नसल्याचे आढळून आले.

☞ एकूण अंगणवाड्यांपैकी ७ हजार ७५८ (७.४६%) अंगणवाड्यांनी मुलांच्या नियमित आरोग्य नोंदी ठेवलेल्या नव्हत्या.

☞ एकूण अंगणवाड्यांपैकी ६ हजार ७९३ (६.५३%) अंगणवाड्यांनी मुलांचे लसीकरण पूर्ण केलेले नव्हते.

***

## ‘बालकांच्या सर्वांगिण विकासात’ अंगणवाडी सेविकेची भूमिका महत्त्वाची !

अंगणवाडी सेविका ही तळागाळात काम करणारी महत्त्वाची व्यक्ती असून लाभार्थी व योजना यामधील महत्त्वाचा दुवा आहे. जर ही योजना खऱ्या अर्थाने यशस्वी करायची असेल जर बालकांचा सर्वांगीण विकास साधायचा असेल बालकांमधील कुपोषण कमी करायचे असेल, बालकांचे शालेय पूर्व शिक्षण साधायचे असेल त्याचप्रमाणे किशोरवयीन मुली, गर्भवती माता व स्तनदा माता व बालकांचे आरोग्य टिकवून ठेवायचे असेल तर अंगणवाडी केंद्र व त्या अंगणवाडी केंद्राच्या जबाबदारी ज्या अंगणवाडी सेविकेची आहे, त्यांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. त्यामुळे या अंगणवाडी केंद्रांची सद्यस्थिती काय आहे. अंगणवाडी सेविकांच्या समस्या काय आहेत. हे जाणून घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या ‘अर्थ व सांख्यिकी संचालनालयाने’ याबाबतची शीघ्र पाहणी करून माहिती गोळा करण्यात आली होती. त्या माहितीच्या आधारे ‘समर्थन’ने राज्यात अंगणवाडी केंद्र व अंगणवाडी सेविकांची काय स्थिती आहे. ‘‘एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची’’, अंमलबजावणी करताना कोणकोणत्या अडचणींना अंगणवाडी सेविकांना सामोरे जावे लागते, याचे विश्लेषण या अहवालात केले आहे.

ग्रामीण भागातील ९१% पेक्षा जास्त व आदिवासी भागातील ८८% अंगणवाडी सेविका त्याच गावात राहणाऱ्या होत्या तर नागरी भागातील ९१% पेक्षा अंगणवाडी सेविका त्याच भागात राहणाऱ्या होत्या. एकूण अंगणवाडी सेविकांचा सरासरी अनुभव १२ वर्षाचा होता. एकूण अंगणवाडी सेविकांपैकी ७८% अंगणवाडी सेविकांचे शिक्षण माध्यमिक स्तरापर्यंत झाले होते.



### ६.१ अंगणवाडी सेविकांची शैक्षणिक पात्रतानिहाय संख्या व टक्केवारी:

तक्ता क्र.२२

| तपशील | ग्रामीण व आदिवासी | | नागरी | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| शिक्षण | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| दहावी पेक्षा कमी | २७,६९६ | २९.२५ | ४६६ | ३.०० | २८,१६२ | २५.५५ |
| दहावी व त्यापेक्षा अधिक | ६६,९९१ | ७०.७५ | १५,०६६ | ९७.०० | ८२,०५७ | ७४.४५ |
| निवास | | | | | | |
| स्थानिक/गावामध्ये | ८४,९३४ | ८९.७० | १४,२१२ | ९१.५० | ९९,१४६ | ८९.९५ |
| इतर ठिकाणी | ९,७५३ | १०.३० | १३२० | ८.५० | ११,०७३ | १०.०५ |
| एकूण | ९४६८७ | १००.०० | १५,५३२ | १००.०० | ११,०२१९ | १००.०० |

(स्त्रोत: *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल*)

☞ राज्यात एकूण १ लाख १० हजार २१९ अंगणवाडी सेविका कार्यरत असून त्यापैकी ८२ हजार ५७ (७४.४५%) अंगणवाडी सेविकांचे शिक्षण १०वी वा त्यापेक्षा अधिक झाले आहे. तर २८ हजार १६२ (२५.५५%) अंगणवाडी सेविकांचे शिक्षण दहावी पेक्षा कमी झाले आहे.

☞ राज्यातील १ लाख १० हजार २१९ अंगणवाडी सेविकांपैकी ९९ हजार १४६ (८९.९५%) अंगणवाडी सेविका या स्थानिक होत्या वा त्या गावातच राहत होत्या. तर ११ हजार ७३ (१०.०५%) अंगणवाडी सेविका या स्थानिक नव्हत्या त्या इतर गावात राहत होत्या.

## 'अंगणवाडी सेविकांच्या समस्या' सरकारला कधी समजणार?

अंगणवाडी सेविकांच्या समस्या जाणून घेण्याअगोदर अंगणवाडी म्हणजे काय हे समजून घ्यायला हवे. भारतातील अंगणवाडीचा हा प्रवास आणीबाणीच्या काळात सुरू झाला. या योजनेचा मुख्य उद्देश गरिबातल्या गरीब बालकांचं पोषण आहार व आरोग्य सुधारण हा होता. एकात्मिक बालविकास सेवा योजना राबवणारा हा उपक्रम जगातला महत्त्वाचा अन्नसुरक्षा कार्यक्रम म्हणूनही ओळखला जातो. एकात्मिक बाल विकास सेवा योजना दि. २ ऑक्टोबर, १९७५ रोजी सुरू झाली. तो काळ आणीबाणीचा होता. केवळ ० ते ६ वर्षाच्या बालकांच्या आरोग्यासाठी काम करून चालणार नाही तर बाळाला जन्म देणाऱ्या आईची काळजी घेतली पाहिजे यासाठी गरोदर आणि स्तनदा मातेसाठी या योजनेचा विस्तार झाला. आज मागास, ग्रामीण, नागरी व आदिवासी क्षेत्रात राहणाऱ्या बालक आणि मातांसाठी या अंगणवाड्यांमधूनच सेवा पुरविल्या जातात. थोडक्यात, वंचित वर्गातील नवी पिढी निरोगी आणि सुदृढ बनविण्यात अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांची महत्त्वाची भूमिका आहे. हा उपक्रम राबविण्याची मुख्य जबाबदारी राज्यातल्या अंगणवाडी सेविकांवर आहे. प्रशासन व लाभार्थी यामधील मुख्य दुवा म्हणजे अंगणवाडी सेविका आहेत.

आज महाराष्ट्रात १ लाख १० हजार २१९ अंगणवाडी सेविका असून तेवढ्याच मदतनीस कार्यरत आहेत. या अंगणवाडी सेविकांच्या अनेक मागण्या आहेत त्यामध्ये, १) अंगणवाडी सेविका शासनाची सेवा करीत असून आम्हाला शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा, २) मानधना ऐवजी वेतन मिळावे व ते वेळेत मिळावे, ३) आरोग्य व आयुर्विमा, शिष्यवृत्ती, घरकुल अनुदान व पेन्शन मिळावी, ४) लाभार्थ्यांना मिळणाऱ्या थेट सेवांच्या दर्जात सुधारणा करावी, ५) योजनांच्या अर्थसंकल्पात वाढीव तरतूद करावी, ६) इतर कार्यक्रमातील व कामातील सहभाग कमी करावा तसेच ७) सहाय्यक परिचारिका यांच्याशी समन्वयाबाबत अनेक अडचणी येत असतात त्या दूर करण्यात याव्यात अशा महत्त्वाच्या मागण्या अंगणवाडी सेविकांच्या आहेत. त्यावर सकारात्मक विचार होणे गरजेचे आहे.



## ६.२ अंगणवाडी सेविकांच्या समस्या:

**तक्ता क्र.२३**

| समस्या | ग्रामीण व आदिवासी | | नागरी | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| अनियमित मानधन | ४१,९४६ | ४४.३० | ९,८३२ | ६३.३० | ५१,७७८ | ४६.९८ |
| कामाचा अतिरिक्त भार | ७६,५०७ | ८०.८० | ११,२७६ | ७२.६० | ८७,७८३ | ७९.६४ |
| सहाय्यक परिचारिका यांच्याशी समन्वयाबाबतच्या समस्या | ४,९२४ | ५.२० | ८७० | ५.६० | ५,७९४ | ५.२६ |
| इतर कार्यक्रम व कामातील सहभाग | ४२,०४१ | ४४.४० | ६,२७४ | ४०.४० | ४८,३१५ | ४३.८४ |
| **एकूण** | **९४,६८७** | **१००.००** | **१५,५३२** | **१००.००** | **१,१०,२१९** | **१००.००** |

(**स्त्रोत** : *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल*)

☞ १ लाख १० हजार २१९ अंगणवाडी सेविका कार्यरत आहेत.

☞ राज्यातील ५१ हजार ७७८ (४६.९८%) अंगणवाडी सेविकांना मिळणारे मानधन नियमित नाही.

☞ राज्यातील ८७ हजार ७८३ (७९.६४%) अंगणवाडी सेविका कामाचा अतिरिक्त भार सहन करीत आहेत.

☞ राज्यातील ५ हजार ७९४ (५.२६%) अंगणवाडी सेविकांना सहाय्यक परिचारिका यांच्याशी समन्वयाबाबत समस्या जाणवतात.

☞ राज्यातील ४८ हजार ३१५ (४३.८४%) अंगणवाडी सेविकांना इतर कार्यक्रम व कामात सहभागी व्हावे लागते.

☞ ग्रामीण व आदिवासी क्षेत्रातील ७६ हजार ५०७ (८०.८०%) अंगणवाडी सेविकांना कामाचा अतिरिक्त भार सहन करावा लागत आहे. तर या क्षेत्रातील ४१ हजार ९४६ (४४.३०%) अंगणवाडी सेविकांना अनियमित मानधनाला सामोरे जावे लागते.

☞ नागरी क्षेत्रातील ९ हजार ८३२ (६३.३०%) अंगणवाडी सेविकांना अनियमित मानधन तसेच ११ हजार २७६ (७२.६०%) अंगणवाडी सेविकांना कामाचा अतिरक्त भार सहन करावा लागतो.

***

*__संदर्भ:__ अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, अंगणवाडी शीघ्र पाहणी अहवाल, राज्य अर्थसंकल्प,'महिला व बाल विकास विभागाचे कार्यक्रम अंदाजपत्रक, खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज-भाग २, शासन निर्णय व परिपत्रक, तसेच समर्थन प्रतिनिधींनी पालघर मधील जव्हार, ठाण्यातील मुरबाड तर नाशिक जिल्ह्यातील नाशिक व इगतपुरी तालुक्यातील अंगणवाड्यांची केलेल्या प्रत्यक्ष पाहणी.*